नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १३५ * * अमरावती * मंगळवार, दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## आझम खान आणि त्यांच्या मुलाला शिक्षा

■ वृत्तसंस्था, रामपूर, दि. १७ :
समाजवादी पक्षाचे नेते आझम खान आणि त्यांचा मुलगा अब्दुल्ला यांना प्रत्येकी सात वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

रामपूरच्या खासदार/आमदार न्यायालयाने सोमवारी बनावट पॅन कार्ड प्रकरणात त्यांना दोषी ठरवले. त्यानंतर लगेचच शिक्षा जाहीर करण्यात आली. न्यायालयाने दोन्ही बाजूंना प्रत्येकी ५०,००० रुपयांचा दंडही ठोठावला. निकालानंतर पोलिसांनी आझम खान आणि अब्दुल्ला यांना न्यायालयात ताब्यात घेतले. आझम खान यांना दोन महिन्यांपूर्वीच तुरुंगातून सोडण्यात आले. त्यांचा मुलगा अब्दुल्ला नऊ महिन्यांपूर्वी हरदोई तुरुंगातून सोडण्यात आला. आता, दोघेही तुरुंगात परततील.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## विधीनिषेध शून्य निकाल

बांगला देशमध्ये २०२४ या वर्षात मोठ्या घडामोडी घडल्या. त्यासाठी अगदी ठरल्याप्रमाणे वंगबंधू शेख मुजीबुर रहमान यांची कन्या शेख हसीना यांना बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने मृत्यू दंडाची म्हणजेच थेट फाशीची शिक्षा सुनावली आहे. शेख हसीना यांच्या काही चुका असतील, पण ज्या आरोपाखाली त्यांना शिक्षा सुनावण्यात आली आहे ते तद्दन बोगस आणि अतिशय फालतू आहेत. त्याचबरोबर हे आरोप सूडबुद्धीने लावलेले आरोप आहेत यात अजिबात शंका नाही. शेख हसीना यांची भारताबरोबर मैत्री होती. आताचे मोहम्मद युनूस सरकार कोणतीही निवडणूक न लढता सत्तेवर आलेले सरकार आहे. एक तर या युनूसाला दोन-चार महिन्यांमध्ये लोकनियुक्त सरकारची स्थापना करणे गरजेचे होते. पण युनूसच्या मनात भारताच्या द्वेषासह, हसीना द्वेष इतका ठासून भरलेला आहे की त्याला शेख हसीना आणि त्यांच्या परिवाराचे नामोनिशाण मिटवायचे आहे असे दिसते. कारण बांगला देशात शेख हसीना यांचे सरकार निवडून आलेले सरकार होते तरीही आम्ही वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यामध्ये थोडीफार गडबड झाली असेल. पण त्यांनी बांगलादेशात सर्वधर्मसमभाव ठेवला होता. जाती धर्मामध्ये द्वेषाची पखरण किंवा पेरणी अजिबात केली नव्हती. अल्पसंख्यांक असणाऱ्या बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार होणार नाहीत याची शेख हसीना यांनी पुरेपूर काळजी घेतली होती. विशेष म्हणजे हिंदूंची पूजास्थाने आणि त्या ठिकाणचे पूजाविधी कायम राहतील, त्यात कोणताही अडथळा येणार नाही अशी व्यवस्थाही केली होती. पण बांगला देशातील पाकप्रेमी अतिरेक्यांना हे मानवणे अजिबात शक्य नव्हते. त्यांना भारत द्वेषाची लागणच झाली होती. ज्या भारताने अन्याय करणाऱ्या परकीय शक्तीच्या म्हणजेच पाकिस्तानच्या जबड्यातून बांगलादेशला बाहेर काढले, त्याच भारताला हे गणंग शत्रू म्हणतात यातच त्यांच्या बुद्धीची कल्पना यावी. इंदिराजी आज असत्या तर त्यांनी या हलकट लोकांवर जोरदार तोफ डागली असती. भारताने आजही शेख हसीना यांच्याबरोबरचा मैत्रीधर्म कायम ठेवलेला आहे पंतप्रधान मोदींनी आणि त्यांच्या सरकारने शेख हसीना यांना भारतात आश्रय देऊन आपला धर्म निभावलेला आहे. कोणत्याही परिस्थितीत फाशी सारख्या शिक्षेचा निर्णय घेणे लोकशाही देशात संभव नाही. पाकिस्तानात तेव्हाच्या सत्ताधाऱ्यांनी झुल्फिकार अली भूत्तो यांना फाशीची शिक्षा सुनावली होती आणि त्याची अंमलबजावणीही केली होती. परंतु बांगला देशातील उपटसुंभ सरकार म्हणजेच, एकतर हे सरकार लोकनियुक्त नाही आणि दुसरे म्हणजे त्यांनी नियुक्त केलेले न्यायाधीश अजिबात निष्पक्ष नाहीत. आता तर बांगला देशातील अवामी लीगचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरलेले आहेत. त्यांना ठिकठिकाणी सरकार मज्जाव करीत असले तरी आता जनताही त्यांनाच साथ देत आहे असे स्पष्टपणे दिसून येत आहे. बेकायदेशीरपणे सत्तेवर बसलेल्या मोहम्मद युनूस सारख्या फणा काढणाऱ्या नागाला बांगला देशातील जनताच उत्तर देईल. बांगला देशवर अन्याय करणाऱ्या बांगलाद्रोही पाकिस्तानला चुचकारणाऱ्या सरकारला बांग्ला भाषिक जनता आता थारा देईल असे अजिबात वाटत नाही. शेख हसीना यांना झालेली शिक्षा अंमलात आणणे शक्यच नाही. हे फक्त फुकटच्या शब्दांचे बुडबुडे आहेत. बांगला देशच्या बोगस न्यायालयाच्या निकालावर अपील करता येते की नाही हे आम्हाला ठाऊक नाही. पण शेख हसीना यांच्यावर घनघोर अन्याय या निकालातून झालेला आहे, एवढे मात्र खास आहे. कसलाही विधीनिषेध नसलेल्या अक्कलशून्य लोकांचा विरोध तरी कशाला करायचा!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

बांगला देशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना

# फाशीची शिक्षा!

कोर्टाने विद्यार्थ्यांच्या हत्येचे दोषी मानले : युनूस म्हणाले, भारताने शेख हसीना यांना सोपवावे



■ वृत्तसंस्था, ढाका, दि. १७ :
बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना सोमवारी दोन आरोपांवर मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली. जुलै २०२४ च्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनांदरम्यान झालेल्या हत्याकांडांचा सूत्रधार म्हणून न्यायाधिकरणाने त्याला नाव दिले. न्यायाधिकरणाने आणखी एक आरोपी, माजी गृहमंत्री असदुज्जमान खान यांना १२ जणांच्या हत्येचा दोषी ठरवले आणि त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली.

दरम्यान, तिसरा आरोपी, माजी आयजीपी अब्दुल्ला अल-मामुन याला पाच वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली. मामुन सध्या कोठडीत आहे आणि तो साक्षीदार बनला आहे. न्यायालयाने हसीना आणि असदुज्झमान कमाल यांच्या मालमत्ता जप्त करण्याचे आदेश दिले. शिक्षा जाहीर होताच, कोर्टरूममधील लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

५ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या सत्तापालटानंतर शेख हसीना आणि माजी गृहमंत्री असदुज्जमान यांनी देश सोडला. दोन्ही नेते गेल्या १५ महिन्यांपासून भारतात राहत आहेत.

यातील उल्लेखनीय बाब अशी की, हसीना यांनीच आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाची स्थापना केली, ज्याने हसीनाला मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. १९७१ च्या बांगलादेश मुक्ती युद्धादरम्यान झालेल्या युद्ध गुन्ह्यांची आणि नरसंहाराची चौकशी करण्यासाठी आणि त्यांच्यावर खटला चालवण्यासाठी २०१० मध्ये याची स्थापना करण्यात आली. १९७३ मध्ये न्यायाधिकरण स्थापन करण्यासाठी कायदा मंजूर झाला असला तरी, ही प्रक्रिया अनेक दशके रखडली होती. हसीना यांनी २०१० मध्ये गुन्हेगारांवर खटला चालवण्यासाठी त्याची स्थापना केली. दरम्यान, शेख हसीना यांना भारताकडून बांगला देशच्या सुपूर्द केले जाते की आणखी नवे वळण येते, हे लवकरच समजेल.

दहशतवादी उमरच्या आणखी एका

## साथीदाराला अटक

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १७ :
दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या दहशतवादी स्फोटात शू बॉम्बचा वापर झाल्याचा संशय सुरक्षा यंत्रणांना आहे. स्फोट झालेल्या कारमधून तपास यंत्रणांना एक शूज सापडला. तपासात अमोनियम नायट्रेट आणि ळअळढ चे अंश आढळले.

एजन्सी याला सुरुवातीचा संकेत मानत आहेत आणि या कोनातूनही तपास करत आहेत. टीएटीपी हे दहशतवादी वापरत असलेले अत्यंत धोकादायक आणि संवेदनशील स्फोटक मानले जाते.

१० नोव्हेंबर रोजी दिल्लीत झालेल्या स्फोटात १३ जणांचा मृत्यू झाला आणि २४ हून अधिक जण जखमी झाले. दरम्यान, ठक्अ ने रविवारी जाहीर केले की, कार चालवणारे डॉ. उमर उल नबी हा आत्मघाती बॉम्बर होता. सुरक्षा यंत्रणेने अधिकृतपणे याची पुष्टी करण्याची ही पहिलीच वेळ आहे, ज्यामध्ये हा स्फोट आत्मघाती हल्ला होता याची पुष्टी केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरक्षा संस्था आता उमरच्या संपूर्ण हालचालींची पुनर्रचना करण्याची तयारी करत आहेत. हे करण्यासाठी, ते स्फोटापूर्वी दहशतवाद्याचा संपूर्ण मार्ग नकाशा तयार करतील. यामध्ये स्फोटापूर्वीचा त्याचा प्रवास आणि त्याचा पत्ता यांचा समावेश असेल.

५० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी टिपलेल्या 20 कारच्या फुटेजच्या आधारे मार्ग नकाशा तयार केला जाईल. यावरून फरिदाबाद ते दिल्लीपर्यंत कोण त्याला भेटले, त्याचा पाठलाग केला किंवा मदत केली की नाही हे निश्चित होईल.

## टॅरिफनंतर भारत-अमेरिका यांच्यात पहिला करार

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १७ :
टॅरिफ वादादरम्यान भारत आणि अमेरिकेने त्यांचा पहिला करार केला आहे. या करारांतर्गत, भारत अमेरिकेकडून अंदाजे २.२ दशलक्ष टन एलवीजी खरेदी करेल. हे भारताच्या वार्षिक गरजांच्या १०% प्रतिनिधित्व करते. हा करार फक्त एका वर्षासाठी, २०२६ पर्यंत वैध आहे.

हा करार भारतातील सरकारी मालकीच्या इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन यांनी अमेरिकन ऊर्जा पुरवठादार - शेवरॉन, फिलिप्स 66 आणि टोटल एनर्जी ट्रेडिंग सोबत केला आहे.

सौदी अरेबियातील रस्ते अपघातात

## ४५ भारतीयांचा मृत्यू



प्रवासी बस आणि डिझेल टँकरची धडक

■ वृत्तसंस्था, रियाध, दि. १७ :
सोमवारी पहाटे सौदी अरेबियात झालेल्या एका रस्ते अपघातात ४५ भारतीयांचा मृत्यू झाला. मक्काहून मदीनाला जाणाऱ्या त्यांच्या बसची डिझेल टँकरशी टक्कर झाली आणि त्यात आग लागली. मृतांमध्ये १८ महिला, १७ पुरुष आणि १० मुले यांचा समावेश आहे. वृत्तानुसार, या अपघातात फक्त बस चालक बचावला.

मदिनापासून सुमारे १६० किलोमीटर अंतरावरील मुहरासजवळ भारतीय वेळेनुसार मध्यरात्री १:३० वाजता हा अपघात झाला. अपघातावेळी अनेक प्रवासी झोपेत होते, त्यामुळे बसने धडक दिल्यानंतर आग लागल्याने त्यांना वाचण्याची शक्यता नव्हती.

तेलंगणा सरकारने या घटनेवर तात्काळ प्रतिक्रिया दिली आणि सांगितले की ते रियाधमधील भारतीय दूतावासाशी सतत संपर्कात आहेत. राज्य सरकारने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी दिल्लीतील अधिकाऱ्यांना पीडितांची ओळख पटविण्यासाठी आणि इतर औपचारिकता पूर्ण करण्यासाठी दूतावासाशी जवळून समन्वय साधण्याचे निर्देश दिले आहेत.

जेद्दाह येथील भारतीय दूतावासाने एक हेल्पलाइन जारी केली आहे. सौदी अरेबियातील मदीनाजवळ भारतीय उमराह यात्रेकरूंना झालेल्या दुःखद बस अपघाताच्या पार्श्वभूमीवर, जेद्दाह येथील भारतीय वाणिज्य दूतावासात २४७७ नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. ८००२४४०००३ असा हेल्पलाइन संपर्क क्रमांक आहे, असे दूतावासाने म्हटले आहे.

या घटनेनंतर, तेलंगणा सरकारने कुटुंबांना त्यांच्या प्रियजनांबद्दल माहिती मिळावी यासाठी सचिवालयात एक नियंत्रण कक्ष स्थापन केला. हैदराबादचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी सौदी अरेबियामध्ये भारतीय उमराह यात्रेकरूंच्या बस अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले आहे.

## कर्जमाफी अंतिम उत्तर नाही

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
शेतकऱ्यांच्या कर्ज माफीवरून राज्यातील राजकारण चांगलेच तापले असताना आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या नव्या वक्तव्यामुळे या चर्चेला नवे वळण मिळाले आहे. अलीकडच्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात झालेले शेतीचे नुकसान, त्यावरचे भरपाईचे पॅकेज आणि कर्जमाफीची मागणी, या सर्वांवर विरोधक सरकारला घेरत असतानाच फडणवीस यांनी कर्जमाफी महत्त्वाचीच आहे, पण कर्जमाफी हे अंतिम उत्तर नसल्याचे स्पष्ट केले आहे.



मराठवाड्यात मागील काही दिवसांत अतिवृष्टी झाली आणि अनेक भागामध्ये शेतजमिनी, पिके, गुरेढोरे वाहून गेली. या अनपेक्षित आपत्तीमुळे हजारो शेतकरी अडचणीत सापडले. राज्य सरकारने नुकसानभरपाईसाठी पॅकेज जाहीर केले असले तरी ते अत्यल्प असून शेतकऱ्यांच्या दुःखाला न्याय देणारे नाही, अशी टीका विरोधकांनी केली.

याच पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधताना कर्जमाफीबाबत मोठे विधान केले. ते म्हणाले की, कर्जमाफी नक्कीच महत्त्वाची आहे. आम्ही ती महत्त्वाचीच मानतो. पण कर्जमाफी हे शेती समस्येचं अंतिम उत्तर नाही. यामुळे तात्पुरता दिलासा मिळतो, पण भविष्यातील संकट टळत नाही. राज्यातील २७ हजार हेक्टर शेती नैसर्गिक शेतीकडे वळवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी मार्गदर्शन देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

## ठाकरे बंधू ११ वर्षांनी स्मृतिस्थळी एकत्र



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा आज १३ वा स्मृतिदिन आहे. या निमित्त बाळासाहेबांना आदरांजली वाहण्यासाठी दादरमधील शिवतीर्थावर शिवसैनिकांची गर्दी जमली होती.

बाळासाहेबांना आदरांजली वाहण्यासाठी उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे ११ वर्षांनी स्मृतिस्थळी एकत्र आले. राज ठाकरे यांच्यासह मनसेच्या नेत्यांनी बाळासाहेबांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी मंचावर उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, राज ठाकरे हे सोबत बसल्याचे दिसून आले. खासदार संजय राऊत मास्क लावून आले होते.

## काँग्रेसने आत्मपरीक्षण करणे अत्याधिक गरजेचे



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
बिहार निवडणुकीच्या निकालांवर देशभरात चर्चा सुरू असताना, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी काँग्रेसच्या अंतर्गत गोंधळ, चुकीचे अंदाज आणि अपयशी रणनीतीवर थेट बोट ठेवले आहे.

एका वृत्तसंस्थेशी बोलताना चव्हाण यांनी पक्षाला आरसा दाखवणारे वक्तव्य केले असून, त्यांनी काँग्रेसच्या सल्लागारांच्या निर्णयक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, मी बिहारला गेलो नाही, पण संपूर्ण राज्यावर भाष्य करणे योग्य ठरणार नाही. तसेच काँग्रेसच्या सल्लागारांनी दिलेले अंदाज वास्तवापासून दूर होते. राजदला ४० जागा देण्याची भूमिका घ्यायला हवी होती. उदारमतवादी भूमिका घेतली असती तर जास्त जागा मिळू शकल्या असत्या, आपण स्वतःचे परीक्षण केले पाहिजे, काँग्रेस काय करत आहे याचे आत्मपरीक्षण केले पाहिजे, असेही चव्हाण यांनी म्हटले आहे.

अजित पवारांच्या नातेवाईकांना

## ५०० कोटींचे हॉस्पिटल?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
महायुती सरकारने ५८० खाटांचे एक हॉस्पिटल उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नातेवाईकांच्या घशात घालण्याचा कट रचल्याचा आरोप अंजली दमानिया यांनी केला आहे. या प्रकरणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे.

दमानियांचा आरोप



वृत्तानुसार, अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्या नातेवाईकांकडून चालवण्यात येणाऱ्या ट्रस्टने गोवंडीत नव्याने बांधण्यात आलेल्या शताब्दी रुग्णालयातील ५८० खाटांच्या वैद्यकीय महाविद्यालयाचे कामकाज ताब्यात घेण्यात रस दर्शवला आहे. मुंबई महापालिकेने हे हॉस्पिटल बांधण्यासाठी सुमारे ५०० कोटींचा खर्च केला. आता बोली प्रक्रियेत केवळ २ पक्ष शिल्लक आहेत. यात सुनेत्रा पवार यांच्या नातेवाईकांचा समावेश आहे. सदरचे रूग्णालय घशात घालण्याचा हा डाव असल्याचे दमानिया म्हणाल्या.

## भावासाठी आदित्य आले धावून

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अमित ठाकरे यांनी ावी मुंबईतील नेरूळ परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण केले होते. स्थानिक पोलिसांनी या घटनेची नोंद घेत अमित ठाकरे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. आता अमित ठाकरे यांच्यासाठी चुलत बंधू आणि आमदार आदित्य ठाकरे धावून आले आहेत. आमच्याच दैवताचा सन्मान नाही करायचा तर कोणाचा करायचा? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी केला आहे.

नवी मुंबईतील नेरूळ परिसरात चार महिन्यांपासून झाकून ठेवलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे मनसेचे नेते अमित ठाकरे यांनी परवानगी न घेता अनावरण केल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता या प्रकरणावरून आदित्य ठाकरे यांनी अमित ठाकरेंची पाठराखण केली असून, निवडणूक आयोगाचे सरकार म्हणत महायुतीवर निशाणा साधला आहे.

# मेळघाटातील रस्त्यासाठी मार्ग काढणार : गडकरी

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १७ :
मेळघाटातील आदिवासींना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि त्यांचा आर्थिक विकास व्हावा यासाठी विविध प्रयत्न करण्यात येत आहेत. कोठा येथील संपूर्ण बांबू केंद्रात बांबूपासून विविध वस्तू तयार करण्यात येत आहेत. येत्या काळात या ठिकाणी पाच कोटी रुपयांच्या कोसा साडी निर्मितीचा उद्योग उभारण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

धारणी तालुक्यातील कोठा येथे भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त आज कार्यक्रम पार पडला, यावेळी कांचन गडकरी, संपूर्ण बांबू केंद्राच्या अध्यक्ष डॉ. निरुपमा देशपांडे, योगेश बापट आदी उपस्थित होते.



गडकरी म्हणाले, आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यांचा विकास व्हावा, समाजात स्थान मिळावे, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. आदिवासींमध्ये कौशल्य असून त्यास प्रशिक्षणाची जोड देणे आवश्यक आहे. संपूर्ण बांबू केंद्राच्या माध्यमातून बांबूच्या सुबक वस्तू तयार करण्यात येत असून जगभरातील ६० देशांमध्ये या वस्तू पोहोचल्या आहेत. त्यामुळे ग्राहक आपल्यापर्यंत चालून आला पाहिजे, अशा वस्तू निर्मिती करण्यावर भर द्यावा. आज विविध क्षेत्रात तंत्रज्ञानाने प्रगती केली आहे. याचा उपयोगही करून घेणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

कोशाच्या साडीला जगभरात मागणी असून यासाठी पाच कोटी रुपयांचा प्रकल्प उभारण्यात येईल. प्रकल्पासाठी आवश्यक असणारा दोन कोटी रुपयांचा स्वनिधी संस्थेसाठी देणगी देण्यात येणार आहे. तसेच तीन कोटी रुपयांचे केंद्राचे सहकार्य देण्यात येईल. साडी निर्मितीसाठी आवश्यक ते प्रशिक्षणही उपलब्ध करून देण्यात येईल.

मेळघाटातील रस्त्यांच्या प्रश्नांची पूर्ण जाण आहे. रस्त्यांच्या विकासाशिवाय या भागाचा विकास शक्य नाही. देशातील महामार्गाचे काम एशियन बँक करीत आहे. त्यामुळे राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून या रस्त्याचे काम कशा पद्धतीने करण्यात येईल, याची माहिती घेण्यात येईल, मेळघाटातील युवकांच्या शिक्षणाच्या व्यवस्थेसाठी दरवर्षी दहा लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येत असून यामुळे गरजू विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय होईल. तसेच मदर डेअरीच्या माध्यमातून दूध संकलनासाठी धारणी आणि अन्य एका ठिकाणी केंद्र उभारण्यात येईल. यातून नगदी पैसे मिळण्यास मदत होईल, असे मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी स्पष्ट आहे.

यावेळी गडकरी यांच्या हस्ते कारागीर हाटचे विमोचन करण्यात आले. डॉ. निरूपमा देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. योगेश बापट यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच प्रशिक्षणार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गरजू कुटुंबांना गॅस शेगडीचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक उपस्थित होते.



श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था, गडचिरोलीचे
दिवंगत संस्थापक अध्यक्ष, 'स्मृतिशेष' शिक्षण महर्षी
प्राचार्य स्व. रमेशचंद्रजी मुनघाटे
यांच्या ७७ व्या जयंती दिनानिमित्य
कोटी कोटी विनंम्र अभिवादन
-: आपल्या आठवणीत :-
श्रीमती शालीनीताई रमेशचंद्रजी मुनघाटे (मा. अध्यक्षा)
सौ. आशि आशिष रोहनकर (कार्याध्यक्षा)
सौ. मिनल रिषी सहानी (सचिव)
श्री. सौरभ रमेशचंद्रजी मुनघाटे (सहसचिव)
श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्थेचे सर्व पदाधिकारी तथा प्रियदर्शिनी कन्या विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, घुग्घूसचे प्राचार्या तसेच शिक्षक, शिक्षीका, प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि समस्त विदयार्थीगण.

# मनसे नेते अमित ठाकरे यांच्यावर गुन्हा

### परवानगीशिवाय शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण



**मुंबई :** नवी मुंबईतील नेरूळ परिसरात चार महिन्यांपासून झाकून ठेवलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे मनसेचे नेते अमित ठाकरे यांनी परवानगी न घेता अनावरण केल्यानंतर या प्रकरणाने मोठा राजकीय रंग घेतला आहे. स्थानिक पोलिसांनी या घटनेची नोंद घेत अमित ठाकरे आणि त्यांच्या सोबत उपस्थित असलेल्या सुमारे 70 मनसैनिकांवर गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे, अमित ठाकरे यांच्या राजकीय प्रवासातील हा पहिलाच गुन्हा असून त्यामुळे या कारवाईकडे राज्यभरातून लक्ष लागले आहे.

नेरूळमधील राजीव गांधी उड्डाणपुलाजवळ उभारलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा गेल्या चार महिन्यांपासून अनावरणाशिवाय तसाच कापडाने झाकलेला होता. नागरिकांकडून या संदर्भात तक्रारी येत असतानाही अधिकृत अनावरणासाठी कोणत्याही मंत्री किंवा पदाधिकाऱ्याला वेळ न मिळाल्याचा स्थानिकांचा आरोप होता. ही बाब अमित ठाकरेंना कळताच त्यांनी कोणतीही परवानगी न घेता मनसैनिकांच्या उपस्थितीत पुतळ्यावरील कापड हटवून अनावरण पूर्ण केले. या वेळी पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केल्याने दोन्ही बाजूंमध्ये ढकलाढकलीही झाली. अमित ठाकरे यांनी केलेले अनावरण हा अचानक घेतलेला निर्णय नसल्याचे त्यांच्या भाषणातून दिसून आले. ते कौपरखैरणे येथे मनसे शाखेच्या उद्घाटनासाठी आले असताना काही कार्यकर्त्यांनी पुतळा धूळ खात पडल्याची माहिती दिली.

### नैसर्गिक शेतीस अनुरूप वाणांची निर्मिती आवश्यक

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :

राज्यात पुढील दोन ते तीन वर्षांत 25 लाख हेक्टर जमीन नैसर्गिक शेतीखाली आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. यासाठी बी-बियाणे उत्पादक कंपन्यानी नैसर्गिक शेतीस अनुरूप वाणांची निर्मिती करणे ही मागणी आहे. बी बियाणे उत्पादक कंपन्यांनी नवकल्पना दिल्यास आपण शाश्वततेकडे जाऊ शकतो, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

आशियाई बी-बियाणे परिषद-2025 चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबई येथे करण्यात आले. या कार्यक्रमाला केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान, आशिया पॅसिफिक सीड असोसिएशनचे अध्यक्ष, श्री.टेकवोंग; नॅशनल सीड असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. एम. प्रभाकर राव, फेडरेशन ऑफ सीड इंडस्ट्री ऑफ इंडियाचे अध्यक्ष अजय राणा, आशिया पॅसिफिक सीड असोसिएशनचे कार्यकारी संचालक फ्रँकलिन सिओ, नॅशनल सीड असोसिएशन ऑफ इंडियाचे कोषाध्यक्ष वैभव काशीकर आणि फेडरेशन ऑफ सीड इंडस्ट्री ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष राजू राठी तसेच विविध देशांतील प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारताची बी-बियाणे बाजारपेठ ही जगातील वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांपैकी एक आहे. आज ती सुमारे




7.8 अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली असून 2030 पर्यंत जवळपास 19 अब्ज डॉलर्सपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. अमेरिका, चीन, फ्रान्स आणि ब्राझीलनंतर भारत जगात पाचव्या क्रमांकावर आहे आणि भारतात वापरल्या जाणाऱ्या 95 टक्के पेक्षा जास्त बियाण्यांचे उत्पादन देशांतर्गत होत असल्याने हा उद्योग थेट मेक इन इंडियाला हातभार लावत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करायचे ध्येय असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

हवामान बदलाचा शेतीवर गंभीर परिणाम होत असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आता लवचिक, हवामान-प्रतिरोधक वाणांची गरज अधिक वाढली आहे. शाश्वत शेतीसाठी रासायनिक निविष्ठांचा वापर कमी करणे आणि नवकल्पक बियाण्यांकडे वाटचाल करणे अत्यावश्यक आहे,मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, बी-बियाणे उद्योगातील पारदर्शकता वाढवण्यासाठी शासन महत्वपूर्ण पावले उचलत आहे. अनिवार्य प्रमाणन, डिजिटल शोधक्षमता, सुव्यवस्थित नोंदणी आणि बनावट बियाणे रोखण्यासाठी कठोर दंडात्मक तरतुदी असे अनेक सुधारात्मक उपाय राबवले जात आहेत.

ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर बी-बियाणे पुरवठा व्यवस्थापनात अत्यावश्यक ठरणार आहे. राज्यातील कृषी धोरणांचा उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राने देशातील पहिले महा कृषी एआय धोरण तयार केले असून 500 कोटी रुपयांच्या प्रारंभिक निधीसह एआय-आधारित कृषी आराखडा विकसित केला आहे.

अॅग्री स्टॅक, महावेध आणि क्रॉपसॅप या डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे आपल्याकडे प्रचंड प्रमाणात कृषी डेटाबेस उपलब्ध आहे. या डेटाचा उपयोग करून शेती अधिक विज्ञाननिष्ठ, पूर्वानुमानक्षम आणि उत्पादनक्षम होऊ शकते, असे ते म्हणाले. पद्मश्री राहीबाई पोपेरे यांनी महाराष्ट्रात देशी वाण आणि देशी बियाणे जपली असल्याचा उल्लेख करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि शेती अधिक शाश्वत बनवणे हे आपले सामायिक ध्येय आहे. शासन व बी बियाणे उद्योगाने हातात हात घालून काम केल्यासच शेतीचे भविष्य सुरक्षित राहील. स्वच्छ वनस्पती कार्यक्रम, देशी वाणांचे संवर्धन आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम घडवून आणण्यावर भर देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी देशभरातील बी-बियाणे उद्योगाला शासनासोबत भागीदारीचे आवाहन केले.

### गॅसच्या मुख्य पाईपलाईनमध्ये तांत्रिक बिघाड

# मुंबईत सीएनजीपुरवठा बंद

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :

मुंबईतील वडाळा परिसरात गेल गॅसच्या मुख्य पाईपलाईनमध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाल्यामुळे रविवारी दुपारपासून संपूर्ण महानगरातील सीएनजी पुरवठा ठप्प झाला आहे. या पाईपलाईनमधून मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईला सीएनजीचा पुरवठा केला जातो. मात्र बिघाडामुळे एकाही पंपावर गॅस पोहोचला नसल्याने सोमवार सकाळपासून रिक्षा, टॅक्सी आणि कॅबची संख्या रस्त्यांवर अत्यंत कमी दिसू लागली. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी पुरवठा बंद पडल्याने नागरिकांना कामावर, शाळेत आणि महत्त्वाच्या ठिकाणी पोहोचताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. अनेक ठिकाणी सकाळपासून प्रवाशांच्या लांबलचक रांगा दिसत होत्या.

वडाळ्यातील आरसीएफ कंपाऊंड परिसरात मुख्य पाईपलाईनमध्ये तांत्रिक त्रुटी आढळल्यानंतर कंपनीने तातडीने पुरवठा बंद केला असल्याचे समजते. मात्र या बिघाडाचे स्वरूप मोठे असल्याने दुरुस्तीला किती वेळ लागेल याबाबत अद्याप स्पष्ट माहिती देण्यात आलेली नाही. सीएनजीपुरवठा बंद असल्याने शहरातील सुमारे 133 पेक्षा जास्त पंपांवर गॅस पूर्णपणे संपला आहे. अनेक वाहनचालक काल दुपारपासून पंपाबाहेर थांबून होते; पण गॅस उपलब्ध न झाल्याने त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले. रिक्षा आणि टॅक्सी चालकांच्या म्हणण्यानुसार, वाहनातील उरलेला गॅस संपेपर्यंत ते सेवा देण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र पुरवठा सुरू न झाल्यास वाहनचालकांचे काम पूर्णपणे बंद पडणार आहे.

महानगर गॅस लिमिटेडने घरगुती ग्राहकांना प्राधान्य देत पीएनजीचा पुरवठा सुरळीत राहील, अशी माहिती दिली आहे. पण सीएनजीवर चालणाऱ्या वाहनांना कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याने वाहतूक व्यवस्थेवर मोठा परिणाम होत आहे. रिक्षा-टॅक्सींसोबतच बेस्टच्या काही बसेसही सीएनजीवर चालतात. त्यामुळे काही बसमार्गांवरही वाहतूक मंदावली आहे. सकाळी शाळांच्या वेळेत मुलांना वाहन मिळाले नाही, तर अनेकांना पायी किंवा खासगी वाहनांची व्यवस्था करून जावे लागले. अनेक पालकांनी सोशल मीडियावरही या परिस्थितीबद्दल नाराजी व्यक्त केली असून तातडीने पुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे. सकाळपासून ठाणे, मुलुंड, घाटकोपर, चेंबूर, वडाळा, दादर, बांद्रा, अंधेरी अशा अनेक भागांत नागरिकांना वाहन मिळण्यास मोठी समस्या निर्माण झाली. रस्त्यांवर काही मोजक्या रिक्षा आणि टॅक्सीज दिसत होत्या, त्या देखील जास्त भाडे मागत असल्याच्या तक्रारी समोर आल्या. सार्वजनिक वाहतूक ठप्प झाल्याने लोकांना कार्यालयात पोहोचण्यासाठी अनेकांनी पयार्यी मार्गांचा वापर केला.

## पुढील अधिवेशनात नवीन बी बियाणे कायदा आणणार : शिवराज सिंह चौहान



**मुंबई:** निकृष्ट व अनधिकृत बीज विक्रीवर नियंत्रणासाठी आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात नवीन बी बियाणे कायदा आणण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली. तसेच महाराष्ट्रात बागायती पिकांना गुणवत्तापूर्ण रोपसामग्री मिळावी यासाठी तीन क्लीन प्लांट सेंटर स्थापन केले जात असल्याचेही त्यांनी जाहीर केले. आशियाई बी बियाणे परिषदेत ते बोलत होते.या परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. शेतकऱ्यांच्या परवडणाऱ्या दरात गुणवत्तापूर्ण बीज उपलब्धतेची गरज व्यक्त करत केंद्रीय कृषी मंत्री चौहान यांनी बी बियाणे उद्योगाने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करावा, असे आवाहन केले. दलहन व तिळहन उत्पादनात खासगी क्षेत्राचे योगदान कमी असल्याने आयातीवरील अवलंबित्व वाढल्याचे सांगत त्यांनी बी बियाणे कंपन्यांनी या क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही नमूद केले. बीजांची उत्पादन तसेच वितरण साखळी पारदर्शक करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या साथी पोर्टलवर सर्व बीज कंपन्यांनी १०० टक्के नोंदणी करणे बंधनकारक राहील, असेही त्यांनी सांगितले. तापमानवाढ आणि बदलत्या हवामानाच्या परिस्थितीला तग धरणाऱ्या वाणांच्या विकासावर भर देण्याची आवश्यकता असल्याचे सांगत कृषी मंत्री .चौहान यांनी शासन आणि खासगी क्षेत्राने एकत्र येऊन शेतकऱ्यांच्या हितासाठी ठोस कृती करावी, असे सांगितले.

### काशिनाथ चौधरी यांच्या भाजप प्रवेशास स्थगिती

# चौधरी पालघर साधू हत्याकांडातील आरोपी



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :

भाजपने पालघर साधू हत्याकांडातील कथित मुख्य आरोपी काशिनाथ चौधरी यांच्या पक्ष प्रवेशास तत्काळ स्थगिती दिली आहे. चौधरी यांच्या पक्षप्रवेशामुळे भाजपवर चौफेर टीका सुरू झाली होती. विशेषतः भाजपच्या कार्यकर्त्यांतही या मुद्यावरून तीव्र रोष व्यक्त करण्यात आला होता. यामुळे राजकीय कोंडी होत असल्याचे लक्षात येताच भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी काशिनाथ चौधरी यांच्या पक्षप्रवेशास तत्काळ स्थगिती देत या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

16 एप्रिल 2020 रोजी पालघरमध्ये साधू हत्याकांड घडले होते. त्यात साधू चिन्मयानंद व सुधाम महाराज यांच्यासह त्यांच्या चालकाची जमावाने निर्घृण हत्या केली होती. या भागात मुले चोरणारी टोळी फिरत असल्याच्या संशयावरून हे हत्याकांड घडले होते. त्यात या तिघांचा नाहक बळी गेला होता. भाजपने या हत्याकांडाचा संबंध हिंदुत्त्वाशी जोडून तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडीच्या सरकावर टीकेची झोड उठवली होती. पण आता भाजपने या प्रकरणातील मुख्य आरोपी काशिनाथ चौधरी यांनाच पक्षात घेतल्यामुळे भाजपवर टीकेची झोड उठली होती.

# राज्यात थंडीचा कडाका वाढला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :

संपूर्ण राज्यात सध्या थंडीचा कडाका चांगलाच वाढला असून बहुतांश भागांत किमान तापमानात लक्षणीय घट होण्यास सुरुवात झाली आहे. जवळजवळ सर्वच जिल्ह्यांमध्ये थंडीची लाट पसरल्याचे चित्र असून नागरिक ठिकठिकाणी शेकोट्यांचा आधार घेत आहेत. मुंबई, पुणे, कोकण, मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात पुढील आठवडाभर थंडीची तीव्रता कायम राहील, असा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्याच्या उत्तरेकडील भागांपासून मराठवाड्यापर्यंत काही दिवसांत तापमानात लक्षणीय घट होणार आहे. त्यामुळे थंडीचा कडाका आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. धुळे येथे रविवारी ८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली, ज्यामुळे नागरिकांनी सकाळीच थंडीचा आनंद घेण्यासाठी घराबाहेर पडण्यास सुरुवात केली. रभणी शहरासह जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून पारा १० अंशांच्या खाली गेला आहे, परिणामी प्रचंड गारठा निर्माण झाला आहे. 'मिनी काश्मीर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाबळेश्वर येथे किमान तापमान १०.२ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. गार वाऱ्यामुळे येथील थंडी अधिक बोचरी झाली आहे. गुलाबी थंडीचा आणि निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणावर महाबळेश्वरकडे वळत आहेत. नंदुरबार जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण तोरणमाळ येथेही तापमान १२ अंश सेल्सिअसच्या आसपास असून चांगलीच हुडहुडी भरली आहे.

वाढत्या थंडीमुळे ग्रामीण भागापासून ते शहरांपर्यंत सर्वत्र शेकोट्या पेटल्याचे दृश्य दिसत आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी नागरिक, शाळकरी विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक उबदार कपड्यांचा वापर करत आहेत. सकाळी लवकर कामावर निघणाऱ्या दूध विक्रेत्यांना, भाजी विक्रेत्यांना आणि औद्योगिक वसाहतीतील कर्मचाऱ्यांना या कडाक्याच्या थंडीचा जास्त सामना करावा लागत आहे. थंडीच्या प्रमाणात वाढ झाल्याने बाजारात उबदार कपड्यांच्या विक्रीतही मोठी वाढ झाली आहे.

## पुण्यात धावत्या ट्रेनखाली येऊन ३ तरुणांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १७ :

पुण्यात रविवारी रात्री झालेल्या एका भीषण रेल्वे अपघाताने शहर हादरले. मांजरी रेल्वे स्थानकाजवळील गोपाळपट्टी परिसरात भरधाव वेगाने सोलापूरच्या दिशेने जाणाऱ्या ट्रेनने तिघा तरुणांना जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी जबरदस्त होती की तिन्ही तरुणांचा जागीच मृत्यू झाला असून त्यांच्या मृतदेहांचे तुकडे तुकडे झाल्याने परिसरात खळबळ उडाली.

मृत तरुणांची ओळख प्रथमेश नितीन तिंडे, तन्मय महेंद्र तुपे आणि तुषार शिंदे अशी करण्यात आली असून तिघेही पुण्यातील रहिवासी होते. अपघाताच्या वेळी पाच जण रेल्वे रुळांवर एकत्र उभे होते. ट्रेन जवळ येताच तिघे जण तिच्या मार्गात सापडले, तर उरलेले दोघे घाबरून घटनास्थळावरून पळून गेले. घटनेची माहिती मिळताच हडपसर पोलीस आणि रेल्वे पोलीस तातडीने घटनास्थळी पोहोचले. तिन्ही मृतदेह ताब्यात घेऊन त्यांना ससून रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले. या तरुणांनी रुळांवर कशासाठी जमाव केला होता, याबाबतची माहिती पोलिसांकडून गोळा केली जात आहे. दरम्यान, मृत तरुणांच्या कुटुंबीयांना ही दुःखद बातमी देण्यात आली असून अचानक झालेल्या या भीषण घटनेने त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## नाशिक नगरपरिषद निवडणुकीतून मनसेची माघार



**नाशिक :** नाशिक जिल्ह्यातील नगरपरिषदेच्या निवडणुकांबाबत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मोठा आणि धक्कादायक निर्णय घेतला आहे. जिल्ह्यात होणाऱ्या या निवडणुकांमधून मनसेने माघार घेतली असून, आपला एकही उमेदवार निवडणुकीच्या रिंगणार उतरवणार नाही. राज ठाकरे यांच्या या निर्णयामुळे जिल्ह्यातील राजकीय वतुर्ळात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, मनसेला महाविकास आघाडीत घेण्याबाबत काँग्रेस विरोध असल्याने राज ठाकरेंनी निवडणुकीतून माघार घेतली का? अशी चर्चा स्थानिक पातळीवर सुरू आहे. राज्यातील 246 नगरपरिषदा आणि 42 नगरपंचायत निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आजचा शेवटचा दिवस होता. आता सर्व पक्षांकडून शक्तीप्रदर्शन, समन्वय बैठकांचा धडाका आणि शेवटच्या क्षणापर्यंत चालणारी धावपळ पाहायला मिळणार आहे. नाशिकमधील 11 नगर परिषदेतील एका जागेवरही अधिकृत उमेदवार न उभा करण्याच्या स्पष्ट सूचना स्वतः राज ठाकरे यांनी दिल्याचे स्थानिक पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# शिवसेनेच्या ६१ आमदारांच्या विरोधात काम केले

### तानाजी सावंत यांचा अजित पवार गटावर गंभीर आरोप

■ महासागर प्रतिनिधी, धाराशिव, दि. १७ :

शिवसेना नेते तथा धाराशिव जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तानाजी सावंत यांनी पुन्हा एकदा महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर गंभीर आरोप केले आहेत. विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादीने शिवसेनेच्या तब्बल 60 आमदारांविरोधात काम केल्याचा धक्कादायक गौप्यस्फोट सावंत यांनी केला आहे. भूम-परंडा-वाशी नगरपालिका निवडणुकांच्या अनुषंगाने आयोजित प्रचार सभेत त्यांनी हे विधान केले.

काही दिवसांपूर्वीच तानाजी सावंत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर बोचरी टीका करत स्वबळाचा नारा दिला होता. दरम्यान, त्यांच्याविरुद्ध निवडणूक लढवलेले राहुल मोटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटामध्ये प्रवेश केल्यानंतर सावंत यांनी नगरपालिका मेळाव्यात महायुतीतील राष्ट्रवादीवर जोरदार टीका केली होती. आता पुन्हा एकदा त्यांनी हल्ला चढवत, अजित पवारांच्या राष्ट्रवादीने शिवसेनेच्या आमदारांविरोधात



काम केल्याचा थेट आरोप केला आहे.

धाराशिव मतदारसंघात बोलताना तानाजी सावंत म्हणाले की, आम्ही महायुती म्हणून एकत्र लढत असताना देखील शिवसेनेच्या 60 आमदारांविरोधात अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शरद पवारांची राष्ट्रवादी यांनी एकत्र येत विरोधात काम केले. दोन्ही राष्ट्रवादी एकच असून राष्ट्रवादी सत्तेशिवाय राहू शकत नाही, या आपल्या जुन्या टीकेवर आजही आपण ठाम असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच, आपल्या मतदारसंघातही दोन्ही राष्ट्रवादीने एकत्रितपणे विरोध केल्याने, आपल्या टीकेवर राष्ट्रवादीला उत्तर देण्याचा नैतिक अधिकार नाही, असेही सावंत यांनी स्पष्ट केले.

हा विरोध करणाऱ्या गोष्टी 60 आमदारांनी वरिष्ठ नेत्यांना सांगितल्या की नाही, हे माहीत नाही. पण मी माझी तक्रार माझ्या नेत्याकडे केली आहे, असे तानाजी सावंत यांनी सांगितले. या विधानामुळे त्यांनी ही गंभीर बाब मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कानावर घातल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. यामुळे महायुतीतील अंतर्गत धुसफूस पुन्हा एकदा समोर आली आहे.

## उद्धव ठाकरेंना निवडणुकीपूर्वी झटका

### डबेवाल्यांच्या मराठमोळ्या संघटनेचा महायुतीला पाठिंबा



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १७ :

मुंबईतील डबेवाल्यांच्या मराठमोळ्या संघटनेने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची साथ सोडण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई महापालिका निवडणुकीच्या ऐन तोंडावर या संघटनेने हा निर्णय घेतल्यामुळे उद्धव ठाकरे यांना जबर झटका बसला आहे. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा फड रंगला आहे. सर्वच राजकीय पक्ष या निवडणुकीसाठी आघाड्या व युत्यांची मोट बांधण्याचा प्रयत्न करत आहेत. पण उद्धव ठाकरे यांच्या भात्यातील मात्र एकेक बाण निखळून पडताना दिसून येत आहे. मुंबईतील बहुतांश माजी नगरसेवकांनी साथ सोडल्यानंतर आता डबेवाला असोसिएशननेही ठाकरे गटाला दिलेला आपला पाठिंबा मागे घेण्याची घोषणा केली आहे. गत निवडणुकीत ठाकरे गटाने दिलेली आश्वासने पूर्ण केली नसल्यामुळे या संघटनेने हा निर्णय घेतला आहे. यामुळे अगोदरच राजकीय कोंडीत सापडलेल्या ठाकरे गटाची चिंता वाढली आहे.

2017 च्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीवेळी शिवसेनेने मुंबईतील डबेवाल्यांना विविध सोयीसुविधा व विकासात्मक योजना देण्याचे आश्वासन दिले होते. यात डबेवाल्यांना संघटित करून स्वतंत्र कंपनी स्थापन करणे, त्या कंपनीला पहिल्या वर्षी किमान 5 कोटींचे भांडवल उपलब्ध करून देणे, सायकलींची खरेदी व सायकल पार्किंगसाठी जागा उपलब्ध करून देणे, मुलांच्या शिक्षणासाठी व कुटुंबासाठी आरोग्यसेवा देण्यासाठी कॉर्पोरेट व सामाजिक संस्थांमार्फत मदत मिळवूनी देणे आणि डबेवाला भवन उभारणे आदी आश्वासनांचा समावेश होता.

पण ठाकरे गटाला केवळ डबेवाला भवन उभारण्याचे आश्वासन काहीअंशी पूर्ण करण्यात यश आले. त्यांनी उर्वरित आश्वासने पूर्ण करण्यात कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे आम्ही ठाकरे गटाला अखेरचा जय महाराष्ट्र करत पाठिंबा काढून घेण्याचा निर्णय घेतला आहे, असे डबेवाला असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी म्हटले आहे. डबेवाल्यांच्या या निर्णयाचा परिणाम मुंबईतील शिवसेनेच्या इतर पारंपरिक मराठी मतदारांवरही पडण्याची शक्यता आहे.

सुभाष तळेकर यांनी यावेळी आगामी निवडणुकीत सत्ताधारी महायुतीला पाठिंबा देण्याचीही घोषणा केली आहे. महायुती सरकारने डबेवाल्यांचा घरांचा प्रलंबित प्रश्न सोडवला आहे. ही आघाडी भविष्यात आमचे इतरही प्रश्न सोडवण्याचा विश्वास वाटत असल्यामुळे आम्ही महायुतीला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे, असे ते म्हणाले. मुंबई डबेवाला असोसिएशनने यापूर्वी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाला पाठिंबा दिला होता.

### पुणे जमीन घोटाळ्यानंतर शासनाचा मोठा निर्णय

# मुद्रांक शुल्क माफीच्या सर्व प्रकरणांची सखोल तपासणी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :

राज्यात नुकत्याच उघडकीस आलेल्या पुण्यातील जमीन गैरव्यवहार प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाने यापुढे मुद्रांक शुल्क माफी मिळालेल्या प्रत्येक प्रकरणाची सखोल तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. महसुलाचा महत्त्वाचा स्रोत असलेल्या मुद्रांक शुल्कातील गैरवापर रोखण्यासाठी विभागाने आता कडक पाऊल उचलले आहे.

सह नोंदणी महानिरीक्षक राजेंद्र मुठे यांनी राज्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांना यासंदर्भात स्पष्ट निर्देश दिले आहेत. दस्त नोंदणीदरम्यान जेथेजेथे शुल्क माफी किंवा सवलत देण्यात आली आहे, त्या सर्व




प्रकरणांची स्वतंत्रपणे पडताळणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

दस्त नोंदणीदरम्यान माफी किंवा सवलत दिल्यास, पुढील प्रक्रिया करण्यापूर्वी त्याची पडताळणी अनिवार्य असेल. प्रत्येक दुय्यम निबंधक कार्यालयाला त्या महिन्यातील सर्व माफीची प्रकरणे दरमहा ५ तारखेपर्यंत जिल्हा मुद्रांक अधिकाऱ्यांकडे तपासणीसाठी पाठवणे अनिवार्य करण्यात आले आहे.

गेल्या काही महिन्यांत दस्त नोंदणी प्रक्रियेत गंभीर अनियमितता समोर आल्या होत्या. यामध्ये रेरा किंवा एनए परवानगीशिवाय दस्त नोंदणी करणे, तसेच चुकीच्या पद्धतीने शुल्क माफीचा दावा करून दस्त नोंदवणे अशा प्रकारांचा समावेश आहे. या अनियमिततांमुळे शासनाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या गैरव्यवहारांमध्ये काही दुय्यम निबंधकांचे निलंबनही करण्यात आले आहे. मुद्रांक शुल्क हा राज्याच्या महसूलाचा महत्त्वाचा स्त्रोत असल्याने, अशा गैरवापरामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी विभागाने कठोर उपाययोजना सुरू केली आहे.

# काँग्रेस संपणार नाही : शरद पवार

■ महासागर प्रतिनिधी
सोलापूर, दि. १७ :



मला जी काँग्रेस समजते ती संपणार नाही, पुन्हा उभारी घेईल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केला. 1957 मध्येही अशीच परिस्थिती आली होती. तेव्हाही काँग्रेस संपली असे म्हटले गेले होते, पण असा पक्ष संपत नसतो, असेही शरद पवार यांनी म्हटले. सोलापूरचे माजी महापौर अॅड. यू. एन. बेरिया यांच्या 50 वर्षांच्या राजकीय-सामाजिक योगदानाच्या सत्कार सोहळ्यानिमित्त ते शहरात आले होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना दुभंगलेला समाज, बिहार निवडणूक निकाल, बेरोजगारी आणि काँग्रेसचे भविष्य या विषयांवर स्पष्ट मते मांडली. काँग्रेसच्या भविष्याविषयी बोलताना राजकारणात चढ-उतार असले तरी काँग्रेस पक्ष कधीही संपणार नाही, असा विश्वास शरद पवार यांनी व्यक्त केला. मला जी काँग्रेस समजते, ती काँग्रेस कधीही संपणारी नाही. महाराष्ट्राचा विचार केला तर 1957 मध्ये काँग्रेसचा पराभव झालेला. संयुक्त महाराष्ट्र समितीचा विजय झाला होता. त्यावेळी काँग्रेस संपली असं म्हटलं गेलं पण पक्ष असे संपत नसतात. चढ उतार असतो, पुन्हा एकदा उभारी घेईल. गांधी-नेहरू ह्यांचा विचार स्वीकारलेली ही काँग्रेस देशात पुन्हा एकदा वेगळ्या स्थितीला पोहोचल्याचे आपण पाहू, असे शरद पवार म्हणाले.

# अचलपूर नगरपरिषदेसमोर उमेदवार, समर्थकांनी तुफान गर्दी

महासागर | प्रतिनिधी

**परतवाडा, (दि. 17)**– अचलपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज (17 नोव्हेंबर 2025) अंतिम दिवस अत्यंत गोंधळात पार पडला. सकाळपासूनच नगरपरिषद कार्यालय परिसर राजकीय गजबजाटाने अक्षरश: यात्रेचे स्वरूप धारण करताना दिसला. सर्वच प्रमुख पक्षांनी आपापल्या उमेदवारांच्या शक्तीप्रदर्शनातून राजकीय रंग अधिक गडद केला.

शिवसेना उबाठा, शिवसेना शिंदे गट, भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार), राष्ट्रवादी (अजित पवार गट), प्रहार, बसपा तसेच अपक्ष उमेदवारांनी शेकडो समर्थकांसह तुफान रॅली काढत



अर्ज दाखल केले. ढोल-ताशा, घोषणा, पार्टी झेंडे, बॅनर यांनी परिसर रंगला होता.

सकाळी 10 वाजल्यापासून नगरपरिषदेसमोरील मुख्य रस्ता पूर्णपणे ठप्प झाला. शेकडो दुचाकी, चारचाकी, ट्रॅक्टर, समर्थकांची दाटी यामुळे नागरिक त्रस्त झाले. व्यापाऱ्यांना दुकान उघडणे-बंद ठेवणेही अवघड झाले. काही ठिकाणी किरकोळ धक्काभुक्कीची प्रकरणे दिसली. मात्र यामध्ये पोलिसांकडून कोणतीही पूर्वतयारी दिसून आली नाही. वाहतूक वळविण्याची व्यवस्था नव्हती, पुरेसे मनुष्यबळ तैनात नव्हते, रॅली नियंत्रणाची कोणतीही प्रभावी यंत्रणा नव्हती, अव्यवस्थित पार्किंगमुळे गोंधळ शिगेला होता.

# अखेरच्या दिवशी नामांकनांचा महापूर!

## नगराध्यक्ष 127, तर सदस्य पदाकरिता 1821 अर्ज प्राप्त




महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 17)**– नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक 2025 साठी नामांकन दाखल करण्याचा आज (दि. 17) शेवटचा दिवस पार पडताच जिल्ह्यात अक्षरश: अर्जांचा महापूर उसळला. सकाळपासूनच उमेदवार, त्यांच्या समर्थकांची प्रचंड गर्दी निवडणूक कार्यालयांत दिसून आली. उशिरापर्यंत काऊंटरसमोर रांगा लागल्या होत्या.

अधिकृत उमेदवार यादी न जाहीर झाल्याने अनेकांनी सावध भूमिका घेत दोन-दोन अर्ज भरले. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार), शिवसेना (उद्धव), शिवसेना (शिंदे गट), वंचित आदी पक्षांनी मोठ्या रॅल्या काढत आपली ताकद दाखवली. काही ठिकाणी पक्षांतर्गत नाराजी उफाळून आली असून बंडखोरीची चिन्हे प्रकर्षाने जाणवली. एकूणच वातावरण पूर्णपणे निवडणूकमय झाले आहे. नामनिर्देशन दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी 17 नोव्हेंबरला सर्व 12 नगरपरिषद, नगरपंचायतमध्ये नगराध्यक्ष पदाकरिता 79 तर नगरसेवक पदाकरिता 871 अर्ज प्राप्त झाल्याने. 10 ते 17 नोव्हेंबर दरम्यान नगराध्यक्ष पदाकरिता 127 आणि सदस्य पदाकरिता 1821 अर्ज प्राप्त झाले आहे.

### पोलिस प्रशासन सज्ज

प्रचंड गर्दीची शक्यता ओळखून प्रशासनाने कडक बंदोबस्त ठेवला होता. फॉर्म तपासणी, ऑनलाईन अर्ज पडताळणी यासाठी अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करण्यात आले. तरीही अनेक ठिकाणी रस्त्यांवर वाहतूक कोंडी झाली. उमेदवारांनी शपथपत्र आणि कागदपत्रे नीट तपासण्यासाठी वारंवार पडताळणी केली. छाननीनंतर किती जण शर्यतीत राहतात याची उत्सुकता आता वाढली आहे.

### अर्जांची प्राप्त आकडेवारी

| | | |
|---|---|---|
| चांदूरबाजार | : | नगराध्यक्ष 10, सदस्य 116 अर्ज |
| अंजनगाव सुर्जी | : | नगराध्यक्ष 14, सदस्य 308 अर्ज |
| मोर्शी | : | नगराध्यक्ष 5, सदस्य 53 अर्ज |
| दर्यापूर | : | नगराध्यक्ष 6, सदस्य 83 अर्ज |

### छाननीपासून मतदानापर्यंतचा प्रवास

18 नोव्हेंबरपासून अर्जांची छानणी सुरू होईल.
21 नोव्हेंबर – अपील नसलेल्या ठिकाणी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख
25 नोव्हेंबर – अपील असलेल्या ठिकाणची अंतिम तारीख
26 नोव्हेंबर – निवडणूक चिन्हांचे वाटप
2 डिसेंबर – मतदान
3 डिसेंबर – मतमोजणी
10 डिसेंबर – निकाल राजपत्रात प्रसिद्ध

### 10 ते 17 नोव्हेंबर पर्यंत प्राप्त नामनिर्देशन अर्ज

| नगर परिषद/ नगरपंचायतचे नाव | अध्यक्ष पदाकरिता एकूण अर्जांची संख्या | सदस्य पदाकरिता एकूण अर्जांची संख्या |
|---|---|---|
| अचलपूर | 22 | 309 |
| अंजनगाव सुर्जी | 14 | 139 |
| दर्यापूर | 7 | 155 |
| चांदूर रेल्वे | 14 | 109 |
| चिखलदरा | 6 | 59 |
| चांदूर बाजार | 5 | 116 |
| शेंदुरजना घाट | 10 | 104 |
| धामणगाव रेल्वे | 6 | 57 |
| मोर्शी | 3 | 182 |
| नांदगाव खंडे, | 13 | 87 |
| धारणी | 11 | 130 |
| एकूण | 127 | 1821 |

### घरातून 2.93 लाखांची चोरी

**अमरावती** – वरुड तालुक्यातील धनोडी येथे मतन रमणलाल धुर्वे (28) यांच्या कपाटातून शनिवारी रात्री अज्ञात चोरट्याने 2.93 लाख रुपये चोरले. धुर्वे यांच्या तक्रारीनंतर वरुड पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

# नांदगाव खंडेश्वरमध्ये अखेरच्या दिवशी उलथापालथ

## भाजपात बंडखोरी, काँग्रेसचे अक्षय पारसकर भाजपात



स्वाती पाठक भाजपा | विना जाधव काँग्रेस पक्ष | असमा परवनीन मरकपा | प्रिती मारोटकर शिवसेना उबाठा | कल्पना मारोटकर रा.कॉं अजित पवार

महासागर | प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर, (दि.17)**– नगर पंचायत निवडणुकीच्या अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी नांदगाव खंडेश्वरमध्ये मोठी राजकीय उलथापालथ दिसून आली. भाजपात बंडखोरी उसळली, तर काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष अक्षय पारसकर यांनी शेवटच्या क्षणी भाजपात प्रवेश करून राजकीय वातावरण तापवले.

आज भाजपाच्या स्वाती पाठक, काँग्रेसच्या विना जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)च्या कल्पना मारोटकर, शिवसेना (उबाठा)च्या प्रीती मारोटकर, तसेच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या आयशा परवीन यांनी आपल्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारी अर्ज दाखल केले. या सर्व उमेदवारांच्या आगमनामुळे तहसील कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरण होते. भाजपात मात्र बंडखोरीचे




प्रमाण उच्चांकी राहिले. भाजपाच्या सुरेखा शिंदे यांनी अपक्ष म्हणून अर्ज भरला. कल्पना मारोटकर यांनी भाजपवर नाराजी व्यक्त करून राष्ट्रवादीङ्क्षशिंदे गटाच्या वतीने उमेदवारी दाखल केली. तसेच विशाल गुल्हाणे यांनीही अपक्ष रिंगणात उडी घेतली. दुसरीकडे, काँग्रेसमध्येही मोठी खळबळ उडाली. माजी नगराध्यक्ष अक्षय पारसकर यांनी काँग्रेस सोडत भाजपात प्रवेश केला आणि नगराध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल करताच गावातील राजकारण पूर्णपणे ढवळून निघाले.

नांदगाव खंडेश्वरच्या 17 प्रभागांसाठी आज एकूण 98 अर्ज दाखल झाले. त्यापैकी नगराध्यक्ष पदासाठी 11, तर नगरसेवक पदासाठी 87 अर्ज प्राप्त झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अश्विनी जाधव यांनी दिली. अंतिम दिवशी झालेल्या या उलथापालथीमुळे नांदगाव खंडेश्वरची निवडणूक चांगलीच रंगणार असून नागरिकांचे लक्ष आता छाननी आणि अंतिम लढतीकडे लागले आहे.

# अध्यक्षपदासाठी 13 आणि नगरसेवक पदासाठी 182 अर्ज दाखल

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, (दि. 17)**– मोर्शी नगरपरिषद निवडणुकीसाठी नामांकन प्रक्रियेचा आज (17 नोव्हेंबर) शेवटचा दिवस अत्यंत गजबजलेला ठरला. सकाळपासून उमेदवार, त्यांचे समर्थक आणि पक्षनेत्यांची मोठी गर्दी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात दिसून आली. अर्ज दाखल करण्याच्या अंतिम क्षणांपर्यंत तुफान हालचाली सुरू होत्या.

10 ते 17 नोव्हेंबरदरम्यान नगराध्यक्ष पदासाठी एकूण 13 उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. आजच्या दिवशीदेखील पाच उमेदवारांनी अर्ज दाखल करत चुरस अधिक वाढवली. भाजप, काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट), तसेच अपक्ष उमेदवारांनी आपापले अर्ज सादर केले. याआधी काही दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), बहुजन समाज पक्ष आणि अन्य अपक्ष उमेदवारांचेही अर्ज दाखल झाले होते. त्यामुळे नगराध्यक्ष पदासाठी बहुकोनी लढत रंगणार असल्याचे संकेत मिळत आहेत. नगरसेवक पदासाठी आज अखेरच्या दिवशी 54 अर्ज दाखल झाले, तर एकूण संख्या 182 वर पोहोचली आहे. प्रत्येक प्रभागातून मोठ्या प्रमाणात नव्या आणि जुन्या चेहऱ्यांनी निवडणूक रिंगणात प्रवेश केला आहे. काही पक्षांनी अधिकृत उमेदवारांची घोषणा उशिरा केल्याने शेवटच्या दिवशी उमेदवारांची धावपळ अधिकच वाढली. निवडणूक कार्यालयाच्या परिसरात दिवसभर वाहनांची गर्दी, समर्थकांच्या घोषणांचे वातावरण जाणवत होते. अनेक उमेदवारांनी कुटुंबीयांसह, समर्थकांसह उत्साहात आपले अर्ज दाखल केले. आता 18 नोव्हेंबरपासून अर्ज छाननीची प्रक्रिया सुरू होणार असून, कोण कोण शर्यतीत टिकणार याकडे मोर्शीकरांचे लक्ष लागले आहे.

# नगराध्यक्ष 14, तर नगरसेवक पदासाठी 308 अर्ज






### रिंगणातून कोण घेणार माघार

अध्यक्ष पदासाठी अखेरच्या दिवशी सोमवारी (दि.17) 10 नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले, तर आतापर्यंत एकुण 14 इच्छुक उमेदवारांनी आपले नामनिर्देशन दाखल केले आहे. तसेच सदस्य (नगरसेवक) पदाकरिता सोमवारी 117 नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले, तर आतापर्यंत 308 नामनिर्देशनपत्र प्राप्त झाले आहे. मोठ्याप्रमाणात अर्ज दाखल झाल्याने अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणूक अत्यंत चुरशीची होणार असून आता दि.21 पर्यंत अर्ज मागे घेण्याच्या टप्प्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी,(दि.17)** – नगरपरिषद निवडणुकीसाठी नामांकन दाखल करण्याचा अखेरचा दिवस अत्यंत गडबडीचा ठरला. नगराध्यक्षपदासाठी 14, तर नगरसेवक पदासाठी तब्बल 308 उमेदवारांनी अर्ज दाखल केले. रविवार आणि सोमवार अशा दोन दिवसांतच उमेदवारांनी अर्जांची 'पावसाळी सरी'च पाडल्याने निवडणुकीत तीव्र चुरस निर्माण झाली आहे.

निवडणूक आयोगाने रविवारीही ऑफलाईन अर्ज दाखल करण्याची परवानगी दिल्याने एका दिवशी 155 उमेदवारांनी अर्ज दाखल केले. तर अंतिम दिवशी 117

### इतर पक्षांचेही उमेदवार घोषीत

शिंदे गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉ. स्पृहा डकरे यांच्या अर्जासाठी माजी खासदार व माजी केंद्रीय मंत्री आनंदराव अडसूळ स्वत: उपस्थित राहिल्याने उत्साहात भर पडली. भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारी अर्जांबरोबर एबी फॉर्म दाखल करण्यासाठी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अविनाश गायगोले स्वत: उपस्थित राहिले. पुरोगामी विचारसरणीचे विनीत डोंगरदिवे यांनी एमआयएम तर्फे नगराध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल केला असून यामुळे अनेकांचे डोळे विस्फारले आहेत.



नामांकनपत्रे प्राप्त झाली. मात्र, शेवटचा दिवस येईपर्यंत एकाही उमेदवाराने पक्षाच्या अधिकृत उमेदवारीचा एबी फॉर्म जोडला नव्हता. रात्रीतूनच पक्षांनी आपापल्या यादी अंतिम केल्याने गावात रात्रभर जागरण आणि एबी फॉर्म पोहोचविण्याची लगबग पाहायला मिळाली. एका राष्ट्रीय पक्षाने तर पहाटे 3 वाजता उमेदवारांच्या घरी एबी फॉर्म पोहोचवल्याची अधिकृत माहिती आहे. शिवसेना उबाठाने सर्व

## एबी फॉर्मसाठी रात्रभर धावपळ

## उबाठा शिवसेनेचे शक्ती प्रदर्शन

### समाधान आणि नाराजीही

शेवटच्या क्षणी एबी फॉर्म मिळालेल्या संतुष्ट चेहऱ्यांसोबतच उमेदवारी नाकारल्या गेलेल्या इच्छुकांच्या नाराजीनेही वातावरण रंगले. पक्षात बंडाळी टाळण्यासाठी शेवटच्या क्षणी फॉर्म वाटप करण्याचा 'फॉर्म्यूला' सर्वच पक्षांनी अवलंबल्याचे स्पष्ट दिसले.

उमेदवारांना एकत्र बोलावून आमदार गजानन लवटे यांच्या कार्यालयातून पायी यात्रेने शक्ती प्रदर्शन करत एबी फॉर्म दाखल केले.

यावेळी संपर्कप्रमुख सुधीर सूर्यवंशी, आमदार गजानन लवटे, संभाजी ब्रिगेडचे प्रेमकुमार बोके, तालुका प्रमुख कपिल देशमुख, बळीराम धर्मे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# कोठा येथे साडी निर्मिती उद्योग उभारणार

- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी
- मेळघाटातील रस्त्यासाठी मार्ग काढणार
- मदर डेअरीचे दोन दूध संकलन केंद्र सुरू करणार



महासागर | प्रतिनिधी

**चिखलदरा, (दि.17)** – मेळघाटातील आदिवासींना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि त्यांचा आर्थिक विकास व्हावा यासाठी विविध प्रयत्न करण्यात येत आहेत. कोठा येथील संपूर्ण बांबू केंद्रात बांबूपासून विविध वस्तू तयार करण्यात येत आहेत. येत्या काळात या ठिकाणी पाच कोटी रुपयांच्या कोसा साडी निर्मितीचा उद्योग उभारण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

धारणी तालुक्यातील कोठा येथे भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त आज कार्यक्रम पार पडला, यावेळी कांचन गडकरी, संपूर्ण बांबू केंद्राच्या अध्यक्ष डॉ. निरुपमा देशपांडे, योगेश बापट आदी उपस्थित होते. गडकरी म्हणाले, आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यांचा विकास व्हावा, समाजात स्थान मिळावे, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. आदिवासींमध्ये कौशल्य असून त्यास प्रशिक्षणाची जोड देणे आवश्यक आहे. संपूर्ण बांबू केंद्राच्या




### धारणी ते अमरावती मार्ग फोर लेन करणार

मेळघाटातील कुपोषण, रस्त्यांची दयनीय अवस्था आणि मूलभूत सुविधांच्या अभावाबाबत बोलताना त्यांनी आश्वासन दिले की, बऱ्हाणपूर-धारणी-अमरावती-यवतमाळ हा रस्ता फोर-लाईन करण्याचा आमचा प्रयत्न सुरू असून तो आम्ही करूनच दाखवणार. या भागातील नागरिकांची मागणी असून चांगल्या रस्त्यांमुळे आर्थिक व सामाजिक विकास वेगाने होईल. यासोबतच त्यांनी आदिवासी मुलींच्या शिक्षणासाठी आपल्या आईच्या स्मरणार्थ दरवर्षी 10 लाख रुपये देण्याची घोषणा केली. तसेच संपूर्ण बांबू केंद्र आणि ग्रामज्ञानपीठासाठी एकूण 5 कोटींची मदत जाहीर केली, यापैकी 2 कोटी गडकरी यांच्या माध्यमातून आणि 3 कोटी भारत सरकारकडून दिले जाणार आहेत.

माध्यमातून बांबूच्या सुबक वस्तू तयार करण्यात येत असून जगभरातील 60 देशांमध्ये या वस्तू पोहोचल्या आहेत. त्यामुळे ग्राहक आपल्यापर्यंत चालून आला पाहिजे, अशा वस्तू निर्मिती करण्यावर भर द्यावा. आज विविध क्षेत्रात तंत्रज्ञानाने प्रगती केली आहे. याचा उपयोगही करून घेणे आवश्यक आहे. कोशाच्या साडीला जगभरात मागणी असून यासाठी पाच कोटी रुपयांचा प्रकल्प उभारण्यात येईल. प्रकल्पासाठी आवश्यक असणारा दोन कोटी रुपयांचा स्वनिधी संस्थेसाठी देणगी देण्यात येणार आहे. तसेच तीन कोटी रुपयांचे केंद्राचे सहकार्य देण्यात येईल. साडी निर्मितीसाठी आवश्यक ते प्रशिक्षणही उपलब्ध करून देण्यात येईल.

मेळघाटातील रस्त्यांच्या प्रश्नांची पूर्ण जाण आहे. रस्त्यांच्या विकासाशिवाय या भागाचा विकास शक्य नाही. देशातील महामार्गाचे काम एशियन बँक करीत आहे. त्यामुळे राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून या रस्त्याचे काम कशा पद्धतीने करण्यात येईल, याची माहिती घेण्यात येईल. मेळघाटातील युवकांच्या शिक्षणाच्या व्यवस्थेसाठी दरवर्षी दहा लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येत असून यामुळे गरजू विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय होईल. तसेच मदर डेअरीच्या माध्यमातून दूध संकलनासाठी धारणी आणि अन्य एका ठिकाणी केंद्र उभारण्यात येईल. यातून दररोज नगदी पैसे मिळण्यास मदत होईल.

### कारागीर हाटचे विमोचन

यावेळी गडकरी यांच्या हस्ते कारागीर हाटचे विमोचन करण्यात आले. डॉ. निरूपमा देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. योगेश बापट यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच प्रशिक्षणार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गरजू कुटुंबांना गॅस शेगडीचे वितरण करण्यात आले.

# आमची लढत थेट महाविकास आघाडीसोबतच- अडसूळ

## जिल्ह्यात शिंदे सेनेचे सहा नगराध्यक्ष उमेदवार रिंगणात




महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,(दि.17)** – महायुतीतल्या घटक पक्षांनी स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असला तरी, आमची खरी लढत महाविकास आघाडीशीच असेल, असा ठाम विश्वास शिवसेना (शिंदे गट) नेते व माजी मंत्री आनंदराव अडसूळ यांनी व्यक्त केला. जिल्ह्यातील सहा नगरपरिषदांत नगराध्यक्ष पदासाठी शिंदे सेनेचे उमेदवार उतरणार असल्याची घोषणा त्यांनी पत्रकार परिषदेत केली.

या पत्रकार परिषदेला शिवसेना उपनेत्या प्रीती बंड, माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता, माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील, सहसंपर्कप्रमुख श्याम देशमुख, जिल्हाप्रमुख आशिष धर्माळे, महिला जिल्हाप्रमुख रेखा खरवडे, अजय महल्ले, वेदांत तळम आदी उपस्थित होते.

निवडणूक 2025 च्या पार्श्वभूमीवर शिंदे सेना स्वबळावर लढण्याच्या भूमिकेवर ठाम असल्याचे अडसूळ यांनी स्पष्ट केले. भाजपा आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत महायुतीचा पर्याय तपासूनही चर्चा निष्फळ ठरली. त्यामुळे सर्वच ठिकाणी नगराध्यक्ष व नगरसेवक पदांवर उमेदवार देण्यात आले असून त्यांना एबी फॉर्म वितरित करण्यात आले आहेत.

या उमेदवारांसह नगरसेवक पदाचे अनेक उमेदवारही रिंगणात उतरले असून शिवसेना पूर्ण ताकदीने निवडणुकीसाठी सज्ज झाली आहे. अडसूळ यांनी अलीकडेच जिल्ह्याचा व्यापक दौरा करून तयारीचा आढावा घेतला आहे. आगामी निवडणुकीत अमरावती जिल्ह्यातील विविध नगरपरिषदांवर पुन्हा भगवा फडकवू, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### नगराध्यक्ष पदासाठी शिंदे सेनेचे जाहीर उमेदवार

| | |
|---|---|
| दर्यापूर | – प्रदीप मलिये |
| अंजनगाव सुर्जी | – डॉ. स्पृहा डकरे |
| अचलपूर | – रेखा जियालाल गड्रेल |
| मोर्शी | – रवी गुल्हाने |
| शेंदूरजना घाट | – मीना श्रीराम कोकाटे |
| वरुड | – सुनिल तुडराम |

## इंटरनॅशनल फ्रॉड अवेयरनेस वीक निमित्त एसबीआय कार्ड कडून ग्राहकांना सतर्क राहण्याचे आवाहन

**नागपूर, १७ नोव्हेंबर :** भारतातील आर्थिक यंत्रणा विकसित होत आहे आणि ग्राहकांची व्यवहार करण्याची पद्धतही वेगाने बदलत आहे. युपीआय, कार्ड पेमेंट्सवर त्यांचा भर असून ई- कॉमर्स प्लॅटफॉर्म व रिटेल आउटलेट्सनाही ते पसंती देत आहेत. दागिन्यांची खरेदी असो, किंवा जीवनशैलीत नवे बदल करणं असो, प्रवासाचे बुकिंग करणे असो किंवा इलेक्ट्रॉनिक गॅजेट्सची माहिती मिळवणे असो, ग्राहक सातत्याने ई- कॉमर्स आणि रिटेल पातळीवर सर्वोत्तम डील्सच्या शोधात असतात.

डिजिटल- फर्स्ट सुविधेला ग्राहकांची वाढती पसंती मिळत असून तत्काळ व्यवहार करण्याचा सोपेपणा त्यांच्या खर्च करण्याच्या मानसिकेतला आकार देत आहे. मूल्याच्या बाबतीत ईकॉमर्सचे वर्चस्व असून सप्टेंबर २०२५ मधे एकूण क्रेडिट कार्ड खर्चाचा त्यातील वाटा ६६.४ टक्के (स्त्रोत -ईटी बीएफएसआय) होता. युपीआय, क्रेडिट कार्ड्स आणि डिजिटल वॉलेट्ससारख्या डिजिल पेमेंट्स पद्धतींचा वापर वाढत असून ग्राहकांनी ऑनलाइन व्यवहार करताना, विविध ऑफर्स आणि डील्सचा सर्वाधिक वापर करताना जागरूक राहणे महत्त्वाचे झाले आहे. इंटरनॅशनल फ्रॉड अवेयरनेस वीकचा एक भाग म्हणून एसबीआय कार्ड, या भारतातील सर्वात मोठ्या प्युअर प्ले क्रेडिट कार्ड कंपनीने ग्राहकांना सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार करताना सतर्क राहाण्याची विनंती केली आहे.

आर्थिक व्यवहार करताना एसबीआय कार्ड कडून देण्यात आल्यात त्यामध्ये विश्वासार्ह प्लॅटफॉर्मद्वारे खरेदी,स्क्रीन शेयरिंग फ्रॉडला प्रतिबंध, डील्स/ऑफर्सची खात्री करून घेणे, रिवॉर्ड पॉइंट्स रिडीम करताना सावधानता बाळगणे,व्यवहारांचे अलर्ट्स तपासने तसेच पेमेंट फ्रॉड्सपासून सावध रहावे इत्यांदीचा समावेश आहे.

## मिडास हॉस्पिटल येथे करण्यात आले मॅग्निफिकेशन नैरो बँड इमेजिंगवरील लँडमार्क कार्यशाळेचे आयोजन

### डॉ. केन्शी याओ यांनी भारतात आणली जागतिक तज्ञता

**नागपूर, १७ नोव्हेंबर :** मिडास हॉस्पिटल, नागपूरने १३ व १४ नोव्हेंबर २०२५ रोजी अत्याधुनिक एंडोस्कोपीवरील एका महत्त्वपूर्ण कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यक्रमाने गॅस्ट्रिक कॅन्सरचे लवकर निदान करण्यासाठी प्रगत एंडोस्कोपिक तंत्रज्ञानाची परिवर्तनशील क्षमता अधोरेखित केली आणि अत्याधुनिक रुग्णसेवेसाठी मिडास हॉस्पिटलच्या वचनबद्धतेची पुन्हा पुष्टी केली.

सामान्य लोकांसाठी,मॅग्निफिकेशन नैरो बँड इमेजिंग (एनबीआय) हे खूप तांत्रिक वाटू शकते. साध्या भाषेत सांगायचे तर, एनबीआय मध्ये विशेष फिल्टर केलेला प्रकाश वापरून पोट आणि आतड्यांतील रक्तवाहिन्या व पृष्ठभागावरील नमुने अधिक स्पष्टपणे दिसतात.जेव्हा हे मॅग्निफिकेशनसह एकत्र केले जाते, तेव्हा डॉक्टरांना न दिसणारे क्षुल्लक ऊतक बदलही दिसू शकतात.थोडक्यात, मॅग्निफिकेशन एनबीआय म्हणजे धूसर फोटो ऐवजी हाय-डेफिनेशन क्लोज-अपअत्यंत महत्त्वाचे सूक्ष्म तपशील अचानक स्पष्ट होतात.

या कार्यशाळेत जपानमधील फुकुओका विद्यापीठाचे प्राध्यापक आणि जागतिक स्तरावर गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी व एंडोस्कोपी क्षेत्रातील अग्रणी मानले जाणारे डॉ.केन्शी याओ उपस्थित होते.डॉ.याओ यांनी आपल्या कारकिर्दीत जीआय ट्रॅक्टमधील कर्करोगाचे लवकर निदान सुधारण्यासाठी अत्याधुनिक तंत्र विकसित करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.त्यांच्या कार्यामुळे जागतिक मार्गदर्शक तत्वांमध्ये बदल घडले आणि जगभरातील गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्टना कॅन्सर प्रतिबंधासाठी प्रगत इमेजिंग स्वीकारण्याची प्रेरणा मिळाली.

गॅस्ट्रिक कॅन्सर हा जगभरातील, विशेषतः आशियातील, सर्वात सामान्य कर्करोगांपैकी एक आहे. दुर्दैवाने, तो अनेकदा हळूहळू वाढतो आणि लक्षणे दिसायला लागतात तेव्हा तो बराच गंभीर टप्प्यात पोहोचलेला असतो. स्क्रीनिंग एंडोस्कोपीमुळे गॅस्ट्रिक कॅन्सरचे लवकर निदान शक्य होते आणि मृत्यूदरात जवळपास ४७% घट होते,जे पोटाच्या कर्करोगाविरुद्ध सर्वात



परिणामकारक सार्वजनिक आरोग्य हस्तक्षेपांपैकी एक आहे.

एंडोस्कोपीमुळे डॉक्टरांना पोटाची आतील त्वचा थेट पाहता येते, बायोप्सी घेता येतात आणि संशयास्पद विकृती पुढे वाढण्यापूर्वीच काढता येतात.मॅग्निफिकेशन एनबीआय सारख्या तंत्रज्ञानामुळे स्क्रीनिंगची अचूकता लक्षणीय वाढते, ज्यामुळे अत्यंत कमी प्रकरणे निदर्शनास न येता पुढे सरकतात.

कार्यशाळेची ठळक वैशिष्ट्ये:

मॅग्निफिकेशन एनबीआय वरील कार्यशाळेत प्रदेशभरातील गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट सहभागी झाले. डॉ. याओ यांनी गॅस्ट्रिक कॅन्सरचे लवकर निदान करण्याच्या बाबतीत आपला विशाल अनुभव शेअर केला आणि सूक्ष्म म्युकोसल बदल ओळखण्याचे महत्त्व अधोरेखित केले. लाईव्ह डेमोमधून मॅग्निफिकेशन एनबीआय कसे सौम्य आणि घातक विकृतींमध्ये अत्यंत अचूकतेने फरक करू शकते हे दाखवण्यात आले.

१५ हून अधिक गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट ने सक्रिय सहभाग घेतला, जिथे लाईव्ह एंडोस्कोपी प्रकरणे सादर करण्यात आली. सहभागी डॉक्टरांनी गॅस्ट्रिक पॅथॉलॉजीसाठी प्रणालीबद्ध स्क्रीनिंगची कला शिकली आणि अत्याधुनिक एंडोस्कोपी तंत्र वापरण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळवला, विशेषतः गॅस्ट्रिक कॅन्सरचे लवकर निदान व व्यवस्थापन यामध्ये त्यांची भूमिका समजावून घेतली.

ही ऐतिहासिक कार्यशाळा मिडास हॉस्पिटलमध्ये डॉ.सौरभ मुकेवार (सीनियर कन्सल्टंट आणि कार्यशाळेचे को- डायरेक्टर),तसेच डेमॉन्स्ट्रेटर डॉ. शुभंकर गोडबोले (कन्सल्टंट गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी), डॉ.भूषण भावरे (कन्सल्टंट गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी) यांच्या प्रयत्नांनी आणि मिडास हॉस्पिटलचे डायरेक्टर अँड चीफ ऑफ युनिट डॉ. श्रीकांत मुकेवार यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली.

या सर्वसमावेशक अनुभवाने सततच्या वैद्यकीय शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले, ज्यामुळे आरोग्यसेवेची गुणवत्ता उंचावते आणि भारतातील रुग्णांनाही जपान व युरोपमध्ये उपलब्ध असलेल्या उच्च दर्जाच्या निदान सोयींचा लाभ मिळतो.

आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांना,विशेषतः डॉ. याओ यांसारख्या व्यक्तींना आमंत्रित करून मिडास हॉस्पिटल नागपूरमध्ये जागतिक तज्ञता आणण्याची आपली वचनबद्धता दाखवते. रुग्णांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा तर मिळतोच, पण जगभरातील सर्वोत्तम वैद्यकीय पद्धतींचाही लाभ मिळतो.

## चहापासून ते बालपणीच्या गोष्टींपर्यंत: सोनी सबचे कलाकार हिवाळ्यातील परंपरा आणि सुंदर आठवणी यांना उजाळा देत आहेत



**मुंबई, १७नोव्हेंबर :** हिवाळा असा मोसम असतो, जो जगाला हळुवार थंडीत लपेटतो आणि त्यासोबत एक ऊब आणि एकत्रपणाची भावना देखील घेऊन येतो. या मोसमात एकत्र येऊन गरमागरम जेवणाचा आस्वाद घेतात. मोसमी पदार्थांचा सुवास वतावरणात दरवळतो आणि ऊबदार क्षणांभोवती आठवणी विणल्या जातात. वाफाळत्या चहाच्या कपापासून ते घरच्या गरमागरम, सुग्रास जेवणापर्यंत हिवाळ नाना तऱ्हेने लोकांना एकत्र आणतो आणि त्यांच्या मनाला तो ऊबदारपणा देतो. यावर्षी सोनी सबचे कलाकार आपल्या हिवाळ्याच्या सुंदर आठवणी, या मोसमातील आपले प्रिय खाद्यपदार्थ याबाबत शेअर करत आहेत. त्या आठवणींची ऊब अनुभवताना हा मोसम का खास आहे, हे सांगत आहेत.

इत्ती सी खुशी मालिकेत हेतल दिवेकरची भूमिका करणारी नेहा एस के मेहता म्हणते, वडोदरा आणि अहमदाबादमध्ये मी लहानाची मोठी झाले. आम्हा गुजराती घरांमध्ये हिवाळा नेहमीच खास असायचा. थंडी वाढू लागली की माझी आई उंधियू सारखे खास हिवाळ्यातील पारंपरिक पदार्थ करायची. सकाळच्या थंडीत आजीसोबत बसून तिळाचे लाडू वळल्याची आठवण देखील मनात ताजी आहे. स्वयंपाकघराच्या आणि तिच्या काहण्यांच्या ऊबेने ते क्षण खरोखर जादुई होऊन जायचे. आजही, मी सेटवर कितीही गुंतलेले असले, तरी थंडीच्या दिवसाची सुरुवात मी आवर्जून हळद आणि गूळ घातलेले दूध पिऊन करते. माझ्यासाठी हिवाळा म्हणजे मस्त ऊब, आपल्या प्रियजनांचा सहवास आणि चिरकाल टिकणाऱ्या आठवणी निर्माण करण्याचा काळ.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत चिरागची भूमिका करणारा नितीन बाबू म्हणतो, माझ्या हृदयात हिवाळ्याचे विशेष स्थान आहे कारण हा ऋतु मला जम्मू आणि काश्मीरमधल्या माझ्या भद्रवाह गावाची आठवण करून देतो. मी डोंगरात वाढलो आहे, त्यामुळे मी हे अनुभवले आहे की, थंडीत सारे काही कसे स्वच्छ, पांढरे शुभ्र दिसते. माझी आई खास काश्मिरी पदार्थ वाजवान बनवायची, त्यावेळी घरभर त्या मसाल्यांचा सुगंध दरवळायचा. कुटुंबासोबत बुखारीजवळ बसून काहवाचा आस्वाद घेतल्याच्या सुस्पष्ट आठवणी अजून ताज्या आहेत. आजही, थंडी आली की मला ते दिवस आठवतात. मी निसर्गप्रेमी आहे आणि माझ्यासाठी, हिवाळ्यातील डोंगर हा माझ्या मनाला शांती देण्याचा उत्तम इलाज आहे. हिवाळा आपल्याला थोडे संथ व्हायला सांगतो, जे अर्थपूर्ण आहे त्याच्याशी निगडीत व्हायला आणि साधेपणात शांती शोधायला सांगतो.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत प्रार्थनाची भूमिका करणारी पूजा कातुर्डे म्हणते, माझ्यासाठी हिवाळा म्हणजे खाण्यापिण्याची चंगळ! मी पुण्याची आहे. हिवाळ्याच्या दिवसांत पारंपरिक मराठी पदार्थांची मेजवानी असते, त्यामुळे मला थंडीचे दिवस आवडतात. माझ्या आठवणीत थंडीच्या दिवसात तिळगूळ करणारी आजी आहे. मला हिवाळा विशेष आवडतो, कारण तो सगळ्यांना एकत्र आणतो. त्या थंड हवेतच असे काही तरी असते की सगळे जण एकमेकांच्या जवळ येतात, एकत्र जेवतात आणि अशी नाती निर्माण करतात जी तो ऋतु संपल्यानंतर देखील टिकून राहतात. आजही, शूटिंग चालू असताना त्या परंपरा चालू ठेवण्याचा माझा प्रयत्न असतो. सह-कलाकारांसोबत गरमागरम जेवणाचा आणि गप्पांचा स्वाद काही औरच असतो. माझ्यासाठी हिवाळा घर, कुटुंबाचे महत्त्व आणि साध्या-साध्या, हृद्य क्षणांचे सौंदर्य जाणवून देणारा ऋतु आहे.

## गोपाल स्नॅक्सने मोडासा उत्पादन केंद्रात नमकीनचे उत्पादन सुरू केले

**राजकोट, १७ नोव्हेंबर :** भारतातील पारंपरिक पॅकेज्ड स्नॅक्स क्षेत्रातील आघाडीची कंपनी गोपाल स्नॅक्स लिमिटेडने उत्तर गुजरातमधील मोडासा येथील उत्पादन कारखान्यात नमकीनचे उत्पादन सुरू केले आहे. या कारखान्यात यापूर्वी फक्त बटाट्याचे वेफर्स आणि फ्रायम्स तयार होत होते, परंतु आता येथे नमकीन तयार करण्याची सुविधा वाढवण्यात आली आहे. यामुळे कंपनीच्या राजकोट आणि नागपूर कारखान्यामधील एकूण उत्पादन क्षमता वाढली आहे तसेच कंपनीचे एकूण उत्पादन नेटवर्क मजबूत झाले आहे.



हा विस्तार गोपाल स्नॅक्सच्या भारतभर आपली उपस्थिती मजबूत करण्याच्या आणि त्यांच्या सर्व उत्पादन केंद्रांमधील कामकाजामध्ये चांगला समन्वय साधण्याच्या मोठ्या योजनेचा भाग आहे. मोडासा येथे नमकीन उत्पादन सुरू झाल्यामुळे कंपनीचा उद्देश पुरवठा अधिक जलद आणि कार्यक्षम करणे, उत्तर व पश्चिम बाजारपेठेमधील वाढती मागणी पूर्ण करणे आणि वितरकांना वेळेवर माल पोहोचवणे हा आहे.

गोपाल स्नॅक्सचे पूर्णवेळ संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) राज हडवाणी म्हणाले, मोडासा केंद्राचा विस्तार करून येथे नमकीन उत्पादन सुरू करणे हे आमच्या पुरवठा व्यवस्थेला अधिक कार्यक्षम बनवण्यासाठी आणि भारतभर वाढत असलेली आमच्या उत्पादनांची मागणी पूर्ण करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. राजकोट आणि मोडासा या दोन्ही ठिकाणी आमचे जास्तीत जास्त नमकीन उत्पादन सुरू केल्यामुळे आम्ही वितरकांना अधिक वेगाने सेवा देऊ शकतो, नवीन बाजारपेठांमध्ये आपली उपस्थिती मजबूत करू शकतो आणि ग्राहकांना उच्च-गुणवत्तेची, विश्वासार्ह उत्पादने सातत्याने उपलब्ध करून देऊ शकतो.

मोडासा हा कृषीप्रधान भाग असल्यामुळे या कारखान्याला बटाटे, शेंगदाणे आणि उडीद यांसारख्या महत्त्वाच्या कच्च्या मालाचा त्वरित पुरवठा होतो. हा सर्व कच्चा माल स्थानिक शेतकऱ्यांकडून थेट खरेदी केला जातो. कंपनीने मोडासा येथे सुमारे ४०,००० मेट्रिक टन क्षमतेचे कोल्ड स्टोरेजही उभारले आहे, ज्यामुळे वर्षभर कच्च्या मालाचा साठा उपलब्ध राहतो आणि उत्पादन सातत्यपूर्ण सुरू ठेवता येते.

या विस्तारानंतर मोडासा कारखान्याची एकूण उत्पादन क्षमता सुमारे २०० मेट्रिक टन प्रतिदिन झाली आहे. या कारखान्यात गोपाल स्नॅक्सच्या अंतर्गत अभियांत्रिकी टीमद्वारे चालवलेल्या पायाभूत सुविधा सुधारणा, उत्पादन प्रक्रिया सुधारणा आणि यांत्रिकीकरणाचे उपक्रम राबवले जात आहेत, जेणेकरून कामकाज अधिक कार्यक्षम होईल आणि उत्पादनाची गुणवत्ता टिकून राहील.

हा विस्तार गोपाल स्नॅक्सच्या दीर्घकालीन वाढीच्या धोरणाला चालना देतो. ज्यामुळे बाजारपेठांपर्यंत जलद पोहोच, उत्पादनाची सातत्यपूर्ण उपलब्धता आणि उत्तर व पश्चिम भारतातील, विशेषतः राजस्थान, पंजाब, हरियाणा आणि मध्य प्रदेशमधील वितरकांना जलद पुरवठा करणे शक्य होईल.

## लोकमंगल सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे २० वर्षे पूर्ण, आजवर ३२०५ जोडप्यांचे जीवनबंधन

**सोलापूर, १७ नोव्हेंबर :** लोकमंगल फाउंडेशनतर्फे सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याला यंदा २० वर्षे पूर्ण झाली. २००६ मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाने आजवर सलग ४६ भव्य विवाह सोहळे आयोजित केले असून, एकूण ३२०५ जोडप्यांचे विवाह सामूहिक पद्धतीने संपन्न केले आहेत. समाजातील दुर्बल व सर्वधर्मीय कुटुंबांना आधार देणारा हा उपक्रम महाराष्ट्रातील सर्वात मोठा आणि सातत्याने राबला जाणारा सामुदायिक विवाह सोहळा ठरला आहे.



या सर्व सामाजिक कामगिरीचे मूळ व्यक्तिमत्त्व म्हणजे माजी सहकार मंत्री व आमदार सुभाष देशमुख. गेल्या दोन दशकांपासून त्यांनी सामुदायिक विवाह सोहळ्याद्वारे समाजातील अनाठायी विवाह खर्चाला आळा घालणे, सर्वधर्म समभाव वाढवणे आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांना उभारी देणे हे उद्दिष्ट साध्य केले आहे.

मागील २० वर्षांत विवाहबद्ध झालेल्या ३२०५ जोडप्यांमध्ये हिंदू २४९२, बौद्ध ६८१, मुस्लिम २१, ख्रिश्चन ०४ आणि जैन ०७ अशी विविध धर्मीय जोडपी सामील आहेत. यामुळे लोकमंगलचा सोहळा हा प्रत्यक्षात सामाजिक सलोखा व एकतेचा संदेश देणारा उपक्रम ठरतो.

आमदार सुभाष देशमुख आणि सौ. स्मिता देशमुख यांच्या हस्ते यंदाही कन्यादान पार पडले. एकूण ४९ हिंदू आणि ३ बौद्ध विवाह संपन्न झाले. सोहळ्यात मोठ्या संख्येने नातेवाईक, नागरिक आणि मान्यवर उपस्थित होते.

आ. देशमुख यांनी सांगितले की, समाजातील वधूवरांना आर्थिक व मानसिक आधार देणे, विवाहातील अनाठायी खर्चाला आळा घालणे आणि दक्षिण तालुक्यातील प्रत्येक गावात सामुदायिक विवाह सोहळा राबवणे हा आमचा संकल्प आहे.

सकाळी सर्व वधू-वरांसाठी समुपदेशन आयोजित करण्यात आले. वैवाहिक जीवनातील समजूतदारपणा, आर्थिक नियोजन, आरोग्यविषयक मार्गदर्शन अशा विविध विषयांवर विशेष चर्चा झाली. त्यानंतर वधूंना शालू, वरांना सपारी आणि रुखवत साहित्याचे वितरण करण्यात आले.

सोहळा स्थळी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. पाहुण्यांसाठी चपाती, भाजी आणि बुंदीचा लाडू असे भोजन देण्यात आले. तसेच खुल्या बग्गीतून काढलेली वधू-वरांची मिरवणूक हा सोहळ्याचा विशेष आकर्षण ठरली. सनई-चौघड्याच्या निनादात ही मिरवणूक सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.

यंदाच्या सोहळ्याला जिल्हा पर्यटन थीमची विशेष झळाळी मिळाली. जिल्ह्यातील ऐतिहासिक ठिकाणे, सांस्कृतिक वारसा, परंपरा आणि पर्यटन स्थळांची माहिती देणारे पॅनेल्स आणि स्टॉल्स मैदानात उभारण्यात आले होते. अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराजांची मूर्ती विशेष आकर्षण ठरली. भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे या संदेशाने उपस्थितांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

या सोहळ्याला धार्मिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून नवदांपत्यांना आशीर्वाद दिला. पंढरपूर मंदिर समितीचे अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, आमदार विजयकुमार देशमुख, मठांचे मान्यवर महाराज मंडळी तसेच रोहिणी तडवळकर, राम जाधव आदींची उपस्थिती विशेष ठरली. सर्व मान्यवरांचा लोकमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष रोहन देशमुख यांनी सत्कार केला.

राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनीही या सोहळ्याला विशेष भेट देऊन नवदांपत्यांना आशीर्वाद दिला. परस्पर समजूतदारपणाचे आणि सहजीवनाचे महत्त्व त्यांनी दांपत्यांना समजावून सांगितले. आमदार सुभाष देशमुख यांनी राज्यपालांचा सत्कार करून स्वागत केले.

४६ सोहळे, ३२०५ विवाह, सर्वधर्मीय एकता, सामाजिक बांधिलकीचा हा सोहळाआज सोलापूरची ओळख बनला आहे. या संपूर्ण उपक्रमामागील विचार, कष्ट आणि सातत्य हे सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाचे विशेष प्रतीक मानले जाते.

## आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाच्या निमित्ताने सोनी सबवरील अभिनेते बोलत आहेत बदलत्या पुरुषत्वाविषयी



**मुंबई, १७ नोव्हेंबर :** जगभरात १९ नोव्हेंबर रोजी आंतरराष्ट्रीय पुरुष दिन साजरा केला जातो. त्यानिमित्ताने आधुनिक पौरुषाविषयीची चर्चा करणे संबद्ध आहे. पुरुषांचा हळवेपणा, भावनिक बुद्धिमत्ता आणि करुणा यांचे चित्रण करून टेलिव्हिजन पौरुषाच्या बदलत्या कल्पना प्रतिबिंबित करतो. यावर्षी सोनी सबवरील प्रतिभावान अभिनेते सांगत आहेत की कशा त्यांच्या भूमिका अधिक वास्तववादी, संबद्ध आहेत आणि आजच्या पुरुषाला समजून घेण्यासाठीची समज वाढवणाऱ्या आहेत.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत राजवीर शास्त्रीची भूमिका करणारा गौरव चोप्रा म्हणतो, आंतरराष्ट्रीय पुरुष दिनी माझ्या मनात नेहमी अशा पुरुषांचा विचार येतो, जे शांतपणे स्वतःला पुन्हा जोडण्याचा प्रयत्न करत आहेत. मी माझी व्यक्तिरेखा राजवीरचा विचार करतो कधीकाळी यशस्वी असलेला हा माणूस एका दुःखद भूतकाळानंतर पुन्हा उभा राहण्याचा प्रयत्न करत आहे. आपले दुखावलेपण लपवण्यासाठी तो क्रोधाचा मुखवटा घालतो, कारण त्याला अन्य मार्ग माहीत नाही. त्याची भूमिका करत असताना माझ्या मनात हा विचार आला की, प्रत्यक्ष जीवनातही किती पुरुष असे करत असतील? मी या भूमिकेतून शिकलो की बरे होणे ही काही कमजोरी नाही. उलट, आपल्या वेदनेतून बाहेर येण्याचा प्रयत्न करणे हे खूप हिंमतीचे काम आहे.

इत्ती सी खुशी मालिकेत विराटची भूमिका करणारा रजत वर्मा म्हणतो, लहानाचा मोठा होत असताना मी आपले प्रेम सौम्यपणे व्यक्त करणारे, कुणीही न सांगता गोष्टी ठीकठाक करणारे, थाटमाट न करणारे पुरुष पाहिले आहेत. मी साकारत असलेला विराट देखील त्याच पठडीतील आहे, ज्याच्याकडे एक सौम्य ताकद आहे. आंतरराष्ट्रीय पुरुष दिनी, माझ्या मनात अशा पुरुषांचा विचार येतो, जे ढोबळ साचेबंद पुरुषांच्या व्याख्येत बसत नाहीत, पण ते संयम, सहानुभूती ठेवून आणि स्थिर राहून जीवन जगतात. विराटची भूमिका करताना मला हे जाणवते की कधीकधी जी सौम्य स्वरूपाची ताकद असते तीच चिरकाल टिकून राहते.

इत्ती सी खुशी मालिकेत संजय भोसलेची भूमिका करणारा ऋषी सक्सेना म्हणतो, माझ्या आयुष्यात मी गुरु, कुटुंबातील सदस्य, सहकारी वगैरे विविध रूपातील अशा पुरुषांना भेटलो आहे, ज्यांनी मला हे दाखवून दिले की, जबाबदारी आणि आपलेपणा एकत्र नांदू शकतात. मी साकारत असलेल्या संजयच्या पत्रात देखील हा समतोल आहे. त्याच्याकडे अधिकार आहे, पण त्याच्यासोबत एक सखोल भावनिक प्रामाणिकपणा देखील आहे. या आंतरराष्ट्रीय पुरुष दिनी, मला पुन्हा या गोष्टीचे स्मरण होत आहे की, पुरुषांनी शक्ती आणि संवेदनशीलता या दोन्हीमधून एकाची निवड करणे आवश्यक नाही. कारण हे दोन्ही गुण एकत्र असू शकतात आणि बऱ्याच जणांच्या ठायी ते दिसतात देखील.

गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय मालिकेत इंद्र देवाची भूमिका करणारा अभिनेता करण सूचक म्हणतो, पौराणिक पात्रे पडद्यावर साकारताना मी हे शिकलो आहे की, ताकद क्वचितच एक-आयामी असते. इंद्र देवाची भूमिका करताना देखील मी अभिमान, हळवेपणा, अनिश्चितता या गोष्टी अनुभवल्या आहेत. या भावना पुरुषांच्या अनुभवास येतात, हेच आपण विसरतो. आंतरराष्ट्रीय पुरुष दिनी, मला वाटते की, पुरुषांना या सर्व भावना अनुभवण्याची मुभा असणे महत्त्वाचे आहे. या भूमिकेतून मी हाच धडा घेतला आहे की, आपण अचूक असल्याचे नाटक करण्यापेक्षा खरेपणा अधिक शक्तीशाली असतो.

## मंगळवार दि. १८ नोव्हेंबर २०२५

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | | | | मुंबई बाजार पत्थर फोड एकच | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ९ | २ | ५ | ६ | ७ |
| ३९० | १३९ | १२३ | १९९ | १५६ | १६८ | १२३ | ५६६ |
| ५७० | २३८ | २६८ | २३४ | २४६ | २३० | २४० | ४४९ |
| ६६० | ३३७ | ३६७ | ३६० | ३४५ | ३४८ | ३३० | ३७७ |
| जोडी | | | | जोडी | | | |
| २८ | ३८ | ६१ | ९१ | २१ | ५१ | ६३ | ७३ |
| २० | ३० | ६४ | ९४ | २९ | ५९ | ६४ | ७४ |
| २७ | ३७ | ६५ | ९५ | २८ | ५८ | ६० | ७० |

जबरदस्त पास होणारे चान्सेस १८, १९ नोव्हें. २०२५

## मंगळवार दि. १८ नोव्हेंबर २०२५

**सर्व बाजार साठी**

०५ - १५ - ४३ - ७३
०६ - १६ - ४२ - ७२
०८ - १८ - ४९ - ७९
--------------------
१९० - ४७० - ६९९ - ४६७
२८० - ५६० - २६६ - ५५७
३७० - ३८० - ३३८ - ३७७

**सर्व बाजारासाठी**

| सोम. ते बुध. ओपन डे | | | | | | सोम. ते बुध. ओपन नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९० | | १७९ | | ४५० | | १६९ | | ५५० | | २८० | |
| ३८० | १ | २७८ | ७ | ३६० | ९ | २६८ | ६ | ३५० | ८ | ३७० | ० |
| ४७० | | ३७७ | | २७० | | ३६७ | | ४४० | | ४६० | |

| सोम. ते बुध. क्लोज डे | | | | | | सोम. ते बुध. क्लोज नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३९ | | ६०० | | ६९० | | ४५६ | | ७०० | | १९९ | |
| २३८ | ३ | १२३ | ६ | ५०० | ५ | १५९ | ५ | ३४० | ७ | २८९ | ९ |
| ३३७ | | २४० | | ७८० | | २५८ | | ८९० | | ३७९ | |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

६ ७ ८ ९ १

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्ही जे काम हाती घ्याल, त्यात यश नक्कीच मिळेल. जर तुम्हाला लहान प्रमाणात व्यवसाय सुरू करायचा असेल तर आजचा दिवस त्यासाठी चांगला आहे.

**वृषभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला जाणार आहे. समाजात तुमची प्रतिष्ठा वाढेल. तुम्ही काही सामाजिक कार्यात सहभागी होऊ शकता. तुमचे कनिष्ठ तुमच्याकडून शिकू इच्छितात.

**मिथुन :** मालमत्तेच्या बाबतीत निर्णय तुमच्या बाजूने होतील. तुमचे विरोधकही तुमच्याकडे मैत्रीचा हात पुढे करतील. आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी नेहमीपेक्षा जास्त मेहनत करावी लागेल.

**कर्क :** नोकरी करणाजयांना चांगल्या ऑफर मिळण्याची शक्यता आहे आणि त्यांचे पगार वाढतील. आज तुम्ही एकांतात काही वेळ घालवाल. तुमच्या भावांसोबत सुरू असलेली समस्या वरिष्ठांच्या मदतीने सोडवली जाईल.

**सिंह :** तुम्ही सौंदर्यप्रसाधनांचा व्यवसाय सुरू करण्याचा विचार करत असाल, तर आजचा दिवस खूप चांगला आहे. या राशीखाली जन्मलेल्या वकिलांचा दिवस खूप चांगला जाईल.

**कन्या :** तुम्ही प्रत्येक परिस्थितीत भावनिक संतुलन राखण्याचा प्रयत्न कराल आणि तुम्ही यशस्वी व्हाल. जर कठीण परिस्थिती उद्भवली तर शांत राहण्याचा प्रयत्न करा. बोलण्यावर संयम ठेवण्याची आवश्यकता आहे.

**तुळ :** आज तुम्हाला तुमच्या टूर आणि ट्रॅव्हल व्यवसायात चांगला नफा मिळेल. काम वाढल्यामुळे तुम्हाला जास्त काम करावे लागू शकते. आज तुम्हाला छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद मिळेल.

**वृश्चिक :** आज करिअरमध्ये प्रगतीचे दरवाजे उघडेल. तुमची सर्वत्र प्रशंसा होईल. आजचा दिवस लहान व्यवसाय सुरू करण्यासाठी चांगला आहे. तुमच्या कुटुंबाकडून तुम्हाला पूर्ण पाठिंबा मिळेल.


**धनु :** आज तुमच्या बाजूने दीर्घकाळापासून सुरू असलेल्या न्यायालयीन खटल्याचा निकाल लागू शकतो. तुम्हाला वरिष्ठ कायदेशीर सल्लागाराची मदत देखील मिळू शकते. मनावरचा भार कमी होईल.

**मकर :** आज, कोणतेही मोठे करार किंवा भागीदारी करण्यापूर्वी तुम्हाला काळजीपूर्वक पुढे जाण्याची आवश्यकता आहे. कुटुंबातील सदस्यांशी काही मुद्द्यांवरून मतभेद होऊ शकतात.

**कुंभ :** आजचा दिवस तुमचा चांगला जाईल. तुम्ही आर्थिक समस्या सहजपणे सोडवू शकाल. उधार दिलेले पैसे तुम्हाला परत मिळू शकतील. तुमच्या कुटुंबासोबत वेळ घालवाल. कुटुंबात तुमचा आदर वाढेल.

**मीन :** विद्यार्थ्यांना आज अधिक मेहनत करावी लागेल. त्यांच्या मेहनतीचे फळ उशिरा मिळेल. प्लास्टिक व्यवसायात गुंतलेल्यांना अपेक्षेपेक्षा जास्त प्रगती दिसेल. कुटुंबातील अडचणी संपण्याचे संकेत आहेत.

## शब्दकोडे क्रमांक २२७१



**आडवे शब्द :-**
१) हुशार, विद्वान
३) दीर्घ श्वास, धमकी
६) श्रेष्ठ पुरुष
१०) जोम, मस्ती
११) अरण्य
१३) ठोक! हाण!
१४) पवित्र
१५) दोन आठवड्याचा काळ
१८) आकाश
१९) मध
२०) श्रीखंडातील प्रमुख पदार्थ
२१) कर्ज देणारा
२२) मयूर
२४) लहान
२७) शहर
२९) यज्ञात टाकण्याचे आहुतीद्रव्य
३१) रम्य
३५) सत्ता
३६) दावानल
३८) मतांची गणना
४१) अधिकारी वर्गाचे प्राबल्य असलेली राज्यव्यवस्था
४३) छोटी लढाई
४६) पुन्हा
४७) तांदळाची एक जात
४८) प्रश्न
५०) व्यापारी फायदा
५३)काळी मैना नावाचे छोटे बोरफळ
५५) शिकार
५७) बांगड्यांचा व्यवसाय करणारी जमात
५९) कवाड, दार
६२) तमाशातील कलाकार
६५) पाकळी, पान
६६) कर्णेंद्रिय
६७) सख्खाभाऊ, गरोदर
६८) धमनी
६९) वाळवंट झकास
७०) हिंदीत क्षण
७१) अतिशय मऊ कापसाचा वृक्ष
७३) चंदन उगाळण्याचा दगड
७५) थांबणे, विश्रांती घेणे
७६) उलटे, विरुद्ध
७९) मीठाची चव
८०) दुबळा, गरीब
८१) पक्षांचा समूह

**उभे शब्द :-**
२) सिद्ध
३) धमकावणी
४) नंतर
५) लालसा (हिं.)
७)लक्ष्मी
८) वीरगती
९) शक्ती
१२) मुस्लीमांची प्रार्थना पद्धती
१४) वाकबगार, निष्णात
१५) पाचवा
१६) हादरा, टक्कर, होड्या थांबण्याचे ठिकाण
१७) व्रत
१८) दर्पण
२३) रविवासर
२५) पुरुष
२६) किराणा व्यापारी
२८) नखे काढण्याचे साधन
२९) नीच
३०) वेळेचा अति सूक्ष्म भाग
३२) जखमेवर लावण्याचे स्निग्ध औषध
३३) मृत्युदेवता
३४) देखत, च्यापुढे
३६)चोपडी
३७)लिहिलेले वाचणारा
३९) तपश्चर्या
४०) सांभाळ, रक्षण
४२)पोवाडे रचणारा
४४) डोंगराचा उभा भाग
४५) व्यायाम
४७) पोट
४९) मधुमक्षिका
५१) अत्तराचा बोळा
५२) ठेकेदार
५३) सारा, टॅक्स
५४) नमन
५६) नाचणी धान्य
५८) टरफल
६०) इंद्र
६१) जागे राहणे
६३) पातळसर
६४) रमविणारा, पती
६६) नहर
७०) पळून गेलेला
७१) शर्करा
७२) नूतन
७४) हस्त, सारा
७७) बासरी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# भूमिगत सांडपाणी प्रकल्पावर हायकोर्टाचे मंथन

## राज्य सरकारला चार आठवड्यांत उत्तर देण्याचे आदेश



### अमृत योजनेतील अपूर्ण काम पूर्ण करण्याची मागणी

राज्य सरकारने 26 मार्च 2018 च्या शासन निर्णयानुसार प्रकल्पाची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सोपवली होती. मात्र आजतागायत काम सुरू झालेले नाही. त्यामुळे अमृत योजनेतील प्रलंबित पहिला टप्पा तातडीने पूर्ण करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती याचिकेत करण्यात आली आहे.

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती (दि.17)–** अमरावती शहराचा तब्बल 27 वर्षांपासून रखडलेला भूमिगत सांडपाणी प्रकल्प पुन्हा एकदा न्यायालयाच्या दारी पोहोचला असून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य सरकार आणि केंद्र सरकार दोघांकडूनही सविस्तर अहवाल मागवला आहे. माजी राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती रजनीश व्यास यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

### निधीअभावी 27 वर्षांचे विलंब

अमरावतीसाठी भूमिगत गटार योजना प्रथम 1997 मध्ये मंजूर झाली होती. त्यावेळी प्रकल्पाचा खर्च 123.04 कोटी रुपये ठरविण्यात आला. निधीचे स्वरूप 23त्न राज्य अनुदान, 66त्न कर्ज आणि 10त्न लोकसहभाग असे निश्चित झाले. मात्र राज्य सरकारने आवश्यक निधी न दिल्याने प्रकल्प अर्धवट राहिला. सहा विभागीय मुख्यालयांमध्ये भूमिगत सांडपाणी व्यवस्था नसलेले अमरावती हे एकमेव शहर असल्याचेही याचिकेत नमूद केले आहे.

### हायकोर्टाची कठोर भूमिका

सरकारच्या वतीने वकील दीपक ठाकरे यांनी बाजू मांडली. सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने राज्य सरकार, केंद्र सरकार, नगरविकास विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांना चार आठवड्यांत सविस्तर उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले. पुढील सुनावणीत प्रकल्पातील विलंब, आर्थिक तुटवडा आणि अंमलबजावणीतील त्रुटींवर न्यायालय सखोल चर्चा करणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### केंद्राच्या योजनेंतर्गत निधी; पण काम मात्र रखडलेच

याचिकाकर्त्यांनी केलेल्या पाठपुराव्यानंतर प्रकल्प नागरी पायाभूत सुविधा विकास योजनेत समाविष्ट केला गेला. या योजनेतून 141.93 कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला. त्यातील 34 कोटी राज्य आणि लोकसहभागातून देणे अपेक्षित होते. मात्र 14 मे 2012 च्या बैठकीत राज्याच्या नगरविकास विभागाने अचानक दुसरा आणि तिसरा टप्पा रद्द करून फक्त पहिल्या टप्प्यास मान्यता दिली. परिणामी प्रकल्पाचे काम पुन्हा ठप्प झाले.

# नगराध्यक्षपदासाठी 14 दावेदार, नगरसेवकांच्या 26 जागांसाठी 155 उमेदवार

## वरुडमध्ये राजकीय रणकंदन



महासागर | प्रतिनिधी

**वरुड, (दि. 17)–** वरुड नगरपरिषद निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी मोठी राजकीय चुरस पाहायला मिळाली. प्रमुख पक्षांनी शेवटच्या क्षणी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जाहीर करताच राजकीय वातावरण तापले असून चौदा दावेदारांच्या उपस्थितीमुळे लढत बहुकोणी होत आहे.

भारतीय जनता पक्षाने ईश्वर सलामे यांना उमेदवार म्हणून निवडले आहे, तर महाविकास आघाडीने प्रशांत धुर्वे यांच्यावर विश्वास दाखवला. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून चेतना वरखडे यांना अधिकृत उमेदवारी देण्यात आली आहे. या तिन्ही प्रमुख दावेदारांसह अन्य पक्ष व अपक्ष उमेदवार मिळून एकूण 14 उमेदवारांनी नगराध्यक्ष पदासाठी नामांकन दाखल केले असून मुकाबला अत्यंत रंगतदार होणार आहे. नगरसेवक पदांसाठीही उमेदवारांनी मोठ्या संख्येने अर्ज दाखल केले. एकूण 26 जागांसाठी तब्बल 155 उमेदवारांची नामांकनपत्रे दाखल झाली आहेत. अनेक प्रभागांत नवीन चेहरे, तसेच अनुभवी नेत्यांचे पुनरागमन अशा मिश्र उमेदवारीमुळे यंदाची निवडणूक अधिकच रोचक झाली आहे. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी पक्षांचे कार्यकर्ते, समर्थक आणि इच्छुकांची प्रचंड गर्दी होती. ढोल-ताशांच्या गजरात अनेकांनी उत्साहात नामांकन भरले. सोशल मीडियावर समर्थकांनी घोषणाबाजी आणि प्रचाराची जोरदार सुरुवात केली असून निवडणूक वातावरण आणखी तापले आहे.

### माघारअंती वाढणार रंगत

आता छाननी, अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख आणि पुढील प्रचार मोहीम यामुळे संपूर्ण वरुड शहरात निवडणुकीची रंगत दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य, शहर विकास यांसारख्या महत्त्वाच्या मुद्यांवर उमेदवार कोणती भूमिका मांडतात हे मतदार कटाक्षाने पाहणार आहेत. इतक्या मोठ्या संख्येने दाखल झालेल्या उमेदवारीमुळे वरुडच्या राजकीय रंगभूमीवर कोण तरणार आणि कोण गळणार, हे पाहण्यासाठी सर्वांचे लक्ष निवडणुकीकडे लागले आहे.

# चोरीचे मंगळसूत्र विकून ऑटो घेतला

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.17) –** गोपाळ नगर परिसरातील मराठा कॉलनीत दिवसाढवळ्या घडलेल्या घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणत गुन्हे शाखेच्या पथकाने एका कुख्यात महिला चोराला अटक केली आहे. तिने चोरी केलेले सोन्याचे मंगळसूत्र विकून मिळालेल्या पैशांत सेकंड-हँड ऑटो रिक्षा खरेदी केल्याचा धक्कादायक खुलासा झाला असून पोलिसांनी ती रिक्षा जप्त केली आहे.

तक्रारदार महिला 28 ऑक्टोबर रोजी मुलांसह नागपूरला गेली होती. तिचा पती घरीच होता. 3 नोव्हेंबर रोजी परतल्यानंतर तिने कपाट उघडून पाहिले असता सोन्याचे मंगळसूत्र गायब असल्याचे लक्षात आले. दोघांनाही चोरीची कल्पना नसल्याने त्यांनी घरातील सीसीटीव्ही तपासला. त्यात 2 नोव्हेंबर रोजी दुपारी 12.45 वाजता सलवार सूट घातलेली महिला घरात शिरताना आणि काही मिनिटांनी बाहेर पडताना स्पष्ट दिसत होती. तक्रार दाखल झाल्यानंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मनीष वाकोडे यांच्या पथकाने परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यातून ही महिला पूर्वीपासून गुन्हेगारी नोंद असलेली कुख्यात चोर असल्याचे समोर आले. त्यानंतर 17 नोव्हेंबरला महिला पोलिसांच्या मदतीने तिला ताब्यात घेण्यात आले.

# ऑटोमधून प्रवास करणाऱ्या महिला टार्गेट

## महिला चोरांची टोळी सक्रिय?

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 17)–** एसटी व ऑटोमध्ये प्रवास करणाऱ्या महिलांना टार्गेट अमरावतीत गेल्या काही दिवसांपासून महिला चोरांची टोळी सक्रिय असल्याची चर्चा वाढली आहे. एसटी बस आणि ऑटोरिक्षातून प्रवास करणाऱ्या महिलांच्या बॅगमधून दागिने व रोख रक्कम चोरीला जाण्याच्या घटना समोर येत आहेत. राजापेठ आणि नांदगाव खंडेश्वर या दोन ठिकाणी अशा पद्धतीच्या चोरीचे प्रकार उघडकीस आले आहेत.

राजापेठ बस डेपो परिसरातील घटनेत एका महिलेकडून सुमारे लाख 11 हजार रुपयांचे दागिने चोरीला गेले. ती वरुड येथील लग्नावरून परतल्यानंतर एसटी डेपोमधून ऑटोरिक्षा घेऊन मुलगी भेटायला निघाली. ऑटोमध्ये आधीच दोन महिला बसलेल्या होत्या. पुढे बस डेपोजवळ त्या दोघी उतरल्या. त्यानंतर तक्रारदार महिला जेव्हा गंतव्यस्थळी उतरली तेव्हा तिला बॅगची साखळी सैल दिसली. तपासल्यावर सोन्याचे दागिने असलेला डबा गायब असल्याचे लक्षात आले. तिने तत्काळ राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली. दोन अनोळखी महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, नांदगाव खंडेश्वर परिसरातही असाच प्रकार घडला. येथील एका महिलेने संशयास्पद हालचाल पाहून सतर्कता दाखवत चार महिलांना पकडले. त्या नागपूरच्या असल्याचे तपासात समोर आले असून पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आहे. सध्या त्यांची चौकशी सुरू आहे.

या दोन्ही घटनांनंतर शहर आणि जिल्ह्यात महिला चोरांची एक संगनमताने काम करणारी टोळी सक्रिय असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. महिलांनी प्रवासादरम्यान विशेष सतर्क राहण्याचे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

# ग्रामपंचायत जुना धामणगाव येथे स्वच्छतेचा आदर्श

## मुख्यमंत्री समृद्धी अभियानांतर्गत गावकऱ्यांची एकजूट, गाव झाले सुशोभित



महासागर | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, (दि. 17) –** पंचायत समिती धामणगाव रेल्वे अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत जुना धामणगाव येथे मुख्यमंत्री समृद्धी पंचायतराज अभियानांतर्गत स्वच्छता मोहीम मोठ्या उत्साहात राबविण्यात आली. ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने आणि गावकऱ्यांच्या सहभागामुळे संपूर्ण गावातील रस्ते, नाले व सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवून परिसर सुशोभित करण्यात आला.या अभियानात सरपंच विश्वेश्वर दिघाडे, उपसरपंच हर्षाताई तायडे, ग्रामपंचायत सदस्य आणि कर्मचारी यांच्यासह गावातील पुरुष, महिला व युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या सामूहिक उपक्रमामुळे ग्रामपंचायत जुना धामणगाव येथील एकजूट व सामाजिक बांधिलकी दिसून येत आहे.स्वच्छता मोहिमेनंतर संपूर्ण ग्रामपंचायत परिसर स्वच्छ, सुंदर आणि आकर्षक दिसू लागला असून ग्रामपंचायतींच्या या कार्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे. हा उपक्रम इतर गावांसाठी आदर्श ठरू शकतो, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

# समाजसेवा हीच खरी राजकारणाची ओळख - डॉ. अनिल बोंडे




## पुसला येथे भव्य आरोग्य शिबिर

महासागर | प्रतिनिधी

**वरुड,(दि.17)–** पुसला येथील सोंडे परिवाराने ग्रामीण जनतेसाठी आरोग्यसेवेचे दारच उघडून ठेवले असून, सामान्यांच्या घरपोच आरोग्यसेवेची ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली आहे, असे गौरवोद्गार राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी काढले. भाजपा महिला जिल्हा उपाध्यक्षा सौ. रुपाली इंद्रभूषण सोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य आरोग्य तपासणी शिबिर, मोफत शस्त्रक्रिया उपक्रम व रक्तदान शिबिराला पुसला आणि परिसरातील नागरिकांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला.

ग्रामीण भागात आरोग्य सुविधा महाग व सहज उपलब्ध नसतानाही सोंडे परिवाराने उचललेला हा उपक्रम उपकार नसून जबाबदारीची जाणीव असल्याचे उद्घाटन करताना डॉ. बोंडे म्हणाले. काही तासांत हजारांवर नागरिकांनी मोफत उपचारांचा लाभ घेतला. स्त्रीरोग, हाडरोग, डोळे, दंत, मधुमेह, रक्तदाब, सामान्य तपासणी आदी विविध विभागांचे तज्ज्ञ उपस्थित असल्याने रुग्णांमध्ये समाधानाचे वातावरण होते. या कार्यक्रमाला विक्रम ठाकरे, डॉ. मनोहर आंडे, दत्ता गेडाम पाटील, श्रीधर सोलव, राजकुमार राऊत, साधना मस्के, संजय श्रीराव आदी मान्यवर उपस्थित होते. नेतृत्व, लोकसहभाग आणि योग्य नियोजनातून ग्रामपातळीवर सकारात्मक परिवर्तन घडू शकते, असेही डॉ. बोंडे यांनी सांगितले. सरपंच सुशीला श्रीराव, उपसरपंच सीमा काळे आणि ग्रामपंचायत टीमचे नियोजन कौतुकास्पद ठरले. अमित खेरडे, सचिन वाकडे, रोशन कांडलकर, अक्षय पवार, चेतन कांडलकर यांनी शिबिरासाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन योगेश श्रीराव यांनी केले, तर प्रज्वल श्रीराव यांनी मनोगतपूर्ण आभार प्रदर्शन केले.



# भातकुलीतील शिक्षकांना 'मूल्यवर्धन'चे धडे

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती/भातकुली, (दि. 17)–** पंचायत समिती भातकुली अंतर्गत 1 ते 8वीच्या सर्व शिक्षकांना 'मूल्यवर्धन' कार्यक्रमांतर्गत दोन टप्प्यात विशेष प्रशिक्षण देण्यात येत असून हे सत्र जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (ष्ठढ्ढश्वञ्ज), अमरावती येथे सुरू आहे. महाराष्ट्र शासन आणि शांतिलाल मुथ्था फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणारा हा उपक्रम शिक्षकांसाठी उपयुक्त ठरणार असून विद्यार्थ्यांमध्ये मूल्यशिक्षणाची रुजवण अधिक प्रभावी करण्याचा हेतू आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, राज्य अभ्यासक्रम 2024 आणि शालेय अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षणाच्या अपेक्षांनुसार 'मूल्यवर्धन' कार्यक्रमाची सुधारित आवृत्ती तयार करण्यात आली आहे. यामध्ये विद्यार्थ्यांमध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांसारख्या संविधानिक मूल्यांचा समावेश बालस्नेही पद्धतीने करण्यावर भर देण्यात आला आहे. हे प्रशिक्षण गटशिक्षणाधिकारी रामेश्वर माळवे यांच्या मार्गदर्शनात तसेच तालुका समन्वयक चंद्रकांत कडबे, शांतिलाल मुथ्था फाउंडेशनच्या समन्वयक ज्योती औघड यांच्या उपस्थितीत सुरू आहे. पहिला टप्पा 11 ते 13 नोव्हेंबर तर दुसरा टप्पा 17 ते 19 नोव्हेंबरदरम्यान आयोजित केला आहे. प्रशिक्षणासाठी प्रितेश मेहरे, राजकुमार गंगराळे, मिनाक्षी खरटमोल, ज्ञानेश्वर सिरसाठ, सुधीर कवाने, पंकज दहिकर, सतीश देशमुख, प्रकाश देशमुख, सतीश वानखेडे आणि शैलेश माकोडे यांसह विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळत आहे. 2025-26 पासून हा उपक्रम राज्यातील मराठी, हिंदी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये सुरू होणार असून मूल्याधारित शिक्षणाची नवी दिशा या प्रशिक्षणातून निश्चितच पुढे येईल, असा विश्वास प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी व्यक्त केला .

# सर्पदंशाने दोघांचा मृत्यू

**अमरावती –** जिल्ह्यात पथ्रोट आणि बेनोडा ठाण्याच्या हद्दीत सर्पदंशामुळे दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. पथ्रोट हद्दीत वडनेर भुजंग येथील राजेंद्र राऊत शेतात काम करीत असताना त्यांना सर्पदंश झाला. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु होता. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. दूसरी घटना बेनोडाहद्दीत मांगरूळी (पेठ) येथे घडली. सुनीता सियाले या महिलेस सर्पदंश झाल्याने त्यांच्यावर अमरावती येथील पीडीएमसीमध्ये उपचार सुरु होते. उपचारादम्यान सुनीता सियाले यांचा मृत्यू झाला आहे.

# कराटे स्पर्धेत जागृतीची चमक



## राष्ट्रीय स्पर्धेत नावलौकीक

महासागर | प्रतिनिधी

**चुरणी, (दि. 17) –** अमृतसर (पंजाब) येथे झालेल्या All India Open Karate Championship मध्ये चुरणी गावची कराटेपटू जागृती (विधी) शशिकांत वरखडे हिने उत्तुंग कामगिरी करत एक सुवर्ण व एक रौप्य पदक पटकावले. World United Sports Karate Organisation तर्फे 8 व 9 नोव्हेंबरला झालेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत सात राज्यांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

महाराष्ट्राच्या महाराष्ट्र स्पोर्ट कराटे अकादमी, नागपूर संघाला सेंसई मिलिंद शिरपूरकर, सेंसई आशीष कांबले आणि सेंसई सरगम नागफटे यांचे मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्राने एकूण 36 पदके जिंकत द्वितीय क्रमांक मिळवला. जागृतीने बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करत आत्मविश्वास, शिस्त आणि कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन केले. तिच्या यशामुळे चुरणी आणि चिखलदरा तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे. आपल्या विजयाचे श्रेय तिने गुरुजन व पालकांना देत विद्यार्थ्यांना संदेश दिला.

# नांदगाव खंडेश्वर तालुक्यात थंडीचा कहर

## तापमानातील घसरण, धुक्याची चादर

महासागर | प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर, (दि.17)–** तालुक्यात गेल्या काही दिवसांत अचानक वाढलेल्या थंडीमुळे सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनात मोठा बदल जाणवत आहे. पहाटेच्या वेळी दाट धुक्याने परिसर वेढून जात असून तापमानात सतत घसरण होत आहे. रात्रीच्या वेळेस वाढलेला गारठा इतका तीव्र आहे की अनेक ठिकाणी नागरिकांना शेकोट्यांचा आधार घ्यावा लागत आहे.



सकाळच्या वेळी रस्त्यांवर दाट धुके पसरत असल्याने वाहनचालकांना समोरील दृश्य स्पष्ट दिसत नाही. मोटारसायकलस्वार आणि चारचाकी वाहनधारकांना वेग कमी करत अत्यंत काळजीपूर्वक वाहन चालवावे लागत आहे. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त कपड्यांचा वापर करावा लागतो असून पालकांमध्येही चिंतेचे वातावरण आहे.

थंडीची सर्वाधिक झळ शेतकऱ्यांना बसत आहे. गहू, हरभरा, चणा आणि कांदा यांसारख्या रब्बी पिकांवर दवबिंदूंचे थर पडू लागले असून वाढत्या ओलाव्यामुळे बुरशीजन्य रोगांचा धोका निर्माण झाला आहे. काही शेतकऱ्यांकडून पिकांची वाढ मंदावल्याची नोंद होत आहे. सकाळी लवकर शेतात जाऊन पिकांची स्थिती पाहावी लागत असल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेतही भर पडली आहे.

### 2 ते 3 अशांनी घट

हवामान विभागाने पुढील काही दिवसांमध्ये तापमानात आणखी 2 ते 3 अंशांनी घट होण्याचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे तालुक्यात 'थंडीची लाट' आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे सर्दी, खोकला, दमा आणि श्वसनाचे विकार वाढण्याचा धोका असल्याने आरोग्य विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

### थंडीची तीव्रता अधिक

गेल्या काही वर्षांच्या तुलनेत यंदाची थंडी अधिक तीव्र असल्याचे स्थानिक रहिवासी म्हणत असून पुढील आठवडा हा या वर्षातील सर्वात थंड ठरणार असल्याची शक्यताही हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. आगामी काळात नागरिक आणि शेतकऱ्यांनी विशेष दक्षता घेण्याची गरज असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

## महिलेमध्ये मारहाण

**अमरावती –** मोर्शी पोलीस स्टेशन हद्दीतील आंबेडकर चौकात राहणाऱ्या 40 वर्षीय महिलेने शनिवारी दुपारी शेजारी राहणाऱ्या 56 वर्षीय महिलेला पतीसोबत प्रेमसंबंध असल्याचा आरोप करत शिवीगाळ केली आणि तिच्यावर हल्ला केला. पीडित महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोप करणाऱ्या महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

**CHANGE OF NAME**
From Name and Date of Birthl Anita, Mother of Dudande Manoj SahebraoResident of Address At-Lasur Post Dhamoli Ta Dapyapur Dist Amaravati State - Maharastra pin 444803 have changed my name from Anita to, Antakala Sahebrao Dudande and my Date of birth from 7 November 1967 to 3 Aug 1965Vide Affidavit Dated- 17-Nov-2025betome Nayk Tahsildar Ta- Daryapup Dist Amravati (Maharastra).

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# फ्लॉवरचं भरीत

इटपट रेसिपी

फ्लॉवरची भाजी आपण नेहमीच खातो. चवीत थोडा बदल हवा असेल तर तुम्ही फ्लॉवरचं भरीत करू शकता. झटपट होणारं हे भरीत तुमच्या जेवणाची लज्जत वाढवेल.

**साहित्य :** एक फ्लॉवर, अर्धा कप मटार, दोन टोमॅटो, एक कांदा, सात लसूण पाकळ्या, आल्याचा तुकडा, चार हिरव्या मिरच्या, लिंबाचा रस एक चमचा, अर्धा चमचा हळद, एक चमचा तिखट, थोडी राई, जीरं, चमचाभर बडिशेप, गरम मसाला, तेल, मीठ आणि कोथिंबिर.

**कृती :** फ्लॉवरचे बारीक तुकडे करून घ्या. कांदा आणि टोमॅटोही चिरून घ्या. गॅसवर कढई ठेवा. त्यात थोडं तेल घाला. तेल तापल्यावर राई घाला. राई तडतडली की जीरं घाला. मग कांदा घालून परतून घ्या. आलं-लसूण वाटून घ्या. कांदा सोनेरी झाला की त्यात आलं-लसूण पेस्ट घालून परता. मिरच्यांचे तुकडे घाला. मग हळद, तिखट, गरम मसाला, बडिशेप घाला. परतून घ्या. यानंतर टोमॅटो घाला. टोमॅटो शिजल्यावर त्यात फ्लॉवर आणि मटार घाला. मध्यम आचेवर शिजवून घ्या. फ्लॉवर आणि मटार शिजल्यावर मॅशरने मॅश करून घ्या. लिंबू



पिळा. दोन मिनिटं शिजवा. गॅस बंद करून वरून कोथिंबिर घाला. हे भरीत पोळी किंवा पराठ्यासोबत छान लागेल.

# जोश

## शेर की जुबानी

चाहत वो नहीं जो जान देती है,
चाहत वो नहीं जो मुस्कान देती है,
ऐ दोस्त चाहत तो वो है, जो पानी
में गिरा आँसू पहचान लेती है।

अब तो वो चाकू लेके
मेरे पिछे पडा है, उसे
कहा था दिल चीर के
देख,तेरा ही नाम होगा

होके मायूस ना यूं शाम
से ढलते रहिये।
जिंदगी भोर है सूरज
सा निकलते रहिये।

# तीनशे रुपयांवरून तीन कोटींची झेप

अचिव्हर

मध्य प्रदेशातील सागर येथील अंशुल सुहाणे यांनी २० वर्षांपूर्वी फक्त ३०० रुपयांपासून सुरू केलेला अगरबत्तीचा व्यवसाय आता तीन कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे.

अंशुल त्यांच्या पूनम अगरबत्ती कारखान्यातून दोनशे प्रकारच्या पूजा साहित्याचे उत्पादन करतात. ते देशभरातील १५ राज्यांना पुरवले जाते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, मध्य प्रदेशातील सागर अगरबत्तीच्या स्वरूपात देशभरात स्वतःची एक नवीन ओळख निर्माण करत आहेत. एकेकाळी सायकलवरून एक किंवा दोन रुपयांना अगरबत्ती विकून प्रवास करणारा अंशुल आता त्यांच्या कारखान्यात ३० लोकांना रोजगार देतो. तीनशे रुपयांवरून तीन कोटी रुपयांपर्यंत जाणे हा सोपा प्रवास नव्हता. त्यात अथक परिश्रम, तीव्र संघर्ष आणि असंख्य आव्हाने होती. त्यावर त्यांनी मोठ्या संयमाने आणि चिकाटीने मात केली.



अंशुल यांच्या कुटुंबात गेल्या तीन पिढ्यांपासून हे काम सुरू आहे. त्यांचे आजोबा अगरबत्तीच्या कारखान्यात बुककीपर होते. त्यांचे वडील त्याच अगरबत्तीच्या कारखान्यात सेल्समन होते. त्यामुळे त्यांना करावे लागणारे कष्ट ते पाहत होते. म्हणून त्यांना वाटले, की आपण इतरांसाठी जे काम करतो, ते आपल्यासाठीच केले तर नफा वाढवता येईल. या विचाराने त्यांनी हा व्यवसाय सुरू केला. तीनशे रुपये किमतीचा कच्चा माल खरेदी केला. घरी अगरबत्ती बनवल्या आणि नंतर त्या विकल्या. ते सायकलने दररोज २० ते २५ किलोमीटर प्रवास करायचे. दुकानदारांकडे जायचे; पण स्थानिक अगरबत्तीमुळे कोणीही त्या खरेदी करत नव्हते. त्या वेळी बंगाल आणि बेंगळुरू येथील अगरबत्ती सागरमध्ये खूप लोकप्रिय होत्या, म्हणून लोकांनी त्यांच्या अगरबत्तीकडे दुर्लक्ष केले.

अगरबत्ती विकली जात नव्हती, तेव्हा त्यांनी कधीकधी बाजारात रस्त्याच्या कडेला चटई पसरवून त्या किरकोळ विक्रीसाठी ५० पैसे, एक रुपया आणि दोन रुपयांना विकल्या. त्यांच्या चांगल्या गुणवत्तेमुळे अगरबत्तींना मान्यता मिळू लागली आणि नंतर त्यांनी त्या धाकटी बहीम पूनमच्या नावावर रजिस्टर केली. एक कारखाना सुरू केला. आता ती देशभरात पूनम अगरबत्ती म्हणून ओळखली जाते. पूजा साहित्य, अगरबत्ती आदींशी संबंधित करत असलेल्या सर्व कामांमध्ये महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी त्यांनी ९० टक्के कामे महिलांना दिली आहेत. अंशुलचे वडील वीरेंद्र सुहाणे आणि त्यांची पत्नीदेखील त्यांच्या कामात त्यांना मदत करतात.

## टेक्नो टॉक

### 'व्हॉट्सअ‍ॅप' प्रोफाईलला आकर्षक बनवणार




'व्हॉट्सअ‍ॅप' आता तुमच्या प्रोफाइलला आणखी आकर्षक आणि पर्सनल बनवण्यासाठी एक धमाकेदार अपडेट घेऊन येत आहे. फेसबुक किंवा लिंक्डइनप्रमाणे आता व्हॉटस्प' प्रोफाइलवर कव्हर फोटो जोडू शकता. आता फक्त प्रोफाइल फोटोपुरते मर्यादित राहण्याची गरज नाही. हा फोटो तुमच्या प्रोफाइलच्या वरच्या भागात मोठा दिसेल. त्यामुळे प्रोफाइल आणखी स्टायलिश होईल. WBetaInfo च्या रिपोर्टनुसार व्हॉट्सअ‍ॅपचे हे नवीन फीचर सध्या टेस्टिंगमध्ये आहे. सध्या ते फक्त व्हॉट्सअ‍ॅप बिझनेस अकाउंट्ससाठी उपलब्ध आहे, पण लवकरच ते सर्व सामान्य वापरकर्त्यांसाठी रोल आउट होईल. अँड्रॉइड बीटा व्हर्जन २.२५.३२.२ मध्ये हे फीचर चाचणीला आहे. प्रोफाइल सेटिंग्जमधून तुम्ही तुमचा आवडता फोटो अपलोड करू शकता. यामुळे चॅटिंगचा अनुभव अधिक मजेदार आणि पर्सनल होईल. व्हॉट्सअ‍ॅपने यात खास सेटिंग्ज जोडल्या आहेत. तुम्ही ठरवू शकता, की कव्हर फोटो कोण पाहू शकेल. 'Everyone', 'My Contacts' किंवा 'No one'. हे पर्याय स्टेटस आणि प्रोफाइल फोटो प्रायव्हसीसारखेच असतील. तुमची माहिती सुरक्षित राहील आणि फक्त तुम्ही ठरवलेल्यांनाच दिसेल. व्हॉट्सअ‍ॅप नेहमीच वापरकर्त्यांना नवीन सुविधा देत असते. हे फीचर आल्यावर तुमचे प्रोफाइल फक्त नाव आणि फोटोचे राहणार नाही, तर ते तुमच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब बनेल. मित्रांना, कुटुंबीयांना तुमची क्रिएटिव्हिटी दाखवा.

# नावीन्यपूर्ण करिअरच्या वाटा

करियर

डिजिटल क्रांती, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि ऑटोमेशनमुळे जगभरातील रोजगार जगात मोठे बदल होत आहेत. काही दशकांपूर्वी अपरिहार्य वाटणाऱ्या अनेक नोकऱ्या आता सामान्य होत आहेत, तर त्याच वेळी नावीन्यपूर्णता आणि वेगवेगळ्या करिअरचा वेगही झपाट्याने वाढत आहे.

**नाहीशा होणाऱ्या नोकऱ्या**

**१. कॅशियर आणि बँक टेलर**

डिजिटल पेमेंट, यूपीआय आणि नेट बँकिंगच्या वापरामुळे कर्मचाऱ्यांना बँकांशी थेट व्यवहार करण्याची गरज कमी झाली आहे.

**२. कॉल सेंटर ऑपरेटर**

एआय आणि चॅटबॉट्स ग्राहकांच्या समस्या सोडवत असल्याने पारंपारिक कॉल सेंटरमध्ये काम करणाऱ्या लोकांची संख्या कमी होत आहे.

**३. ट्रॅव्हल एजंट**

ऑनलाइन बुकिंग ॲप्स आणि वेबसाइट्समुळे लोक स्वतःहून त्यांच्या प्रवासाचे नियोजन करतात. त्यामुळे ट्रॅव्हल एजंट्सची गरज जवळजवळ संपली आहे.

**४. ट्रक ड्रायव्हर**

स्वयंचलित वाहनांच्या आगमनामुळे भविष्यात ट्रक ड्रायव्हर्सची मागणी लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते.

**५. टेलिमार्केटर**

स्वयंचलित व्हॉइस कॉल सिस्टीममुळे



टेलिमार्केटिंग करणाऱ्यांची गरज कमी होते.

**६. कार्यालयीन सहाय्यक आणि लिपिक**

बैठकांचे वेळापत्रक, फाइल व्यवस्थापन आणि मेल हाताळणीसाठी डिजिटल साधने आणि सॉफ्टवेअर वापरले जातात.

**नवीन नोकऱ्या**

*** कृत्रिम बुद्धिमत्ता अभियंते (एआय अभियंते)**

सर्व क्षेत्रात 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर होत असल्याने, या क्षेत्रातील तज्ज्ञांची मागणी झपाट्याने वाढणार आहे.

*** सायबरसुरक्षा तज्ज्ञ**

डिजिटल वर्तन आणि डेटा गोपनीयतेच्या वाढत्या धोक्यामुळे सायबरसुरक्षा क्षेत्रातील करिअर अधिक स्थिर आणि फायदेशीर होतील.

*** डेटा सायंटिस्ट आणि विश्लेषक**

मोठ्या प्रमाणावर गोळा केलेल्या डेटाचे विश्लेषण करून निर्णय घेण्याची गरज या क्षेत्रातील कंपन्या किंवा तज्ज्ञांना आहे.

*** गेम डेव्हलपर आणि ॲनिमेटर**

मनोरंजन आणि शिक्षण क्षेत्रात डिजिटल कंटेंटच्या वाढत्या मागणीमुळे, या क्षेत्रात भरपूर संधी उपलब्ध आहेत.

*** पर्यावरण आणि शाश्वत विकासतज्ज्ञ**

जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संरक्षण क्षेत्रातील कारकिर्द महत्त्वाची बनेल.

*** डिजिटल मार्केटिंग आणि सोशल मीडिया मॅनेजर**

ब्रँड आणि कंपन्यांना त्यांची ऑनलाइन उपस्थिती टिकवून ठेवण्यासाठी या क्षेत्रातील कुशल तज्ज्ञांची मागणी सतत वाढत आहे.

*** वैद्यकीय सुधारक आणि जैवतंत्रज्ञानशास्त्रज्ञ**

आरोग्यशी संबंधित सुधारणा, ग्लुटेन उत्पादन आणि औषध विकासामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे.


*** रोबोटिक्स अभियंता**

औद्योगिक क्षेत्रात रोबोटचा वापर वाढल्याने, या क्षेत्रातील अभियंत्यांना मोठ्या संधी मिळतील.

# वयात अंतर आहे

मॅच मेकिंग

मी २७ वर्षांची तरुणी असून एका कंपनीत उच्चपदस्थ अधिकारी आहे. माझं एका मुलावर प्रेम आहे. पण तो माझ्याहून पाच वर्षांनी लहान आहे. आम्ही शेजारी असून लहानपणापासून एकमेकांना ओळखतो. आमचे कुटुंबिय हे नातं स्वीकारण्याची शक्यता तशी कमी असली तरी या नात्याचा गांभीर्याने विचार करावा असं मला वाटतं. या मुलाचंही माझ्यावर प्रेम असावं. हा मुलगा २२ वर्षांचा असून त्याचं शिक्षण पूर्ण व्हायचं आहे. त्याला मास्टर्स करायचं आहे. मला हा मुलगा आवडतो. अशा परिस्थितीत मी काय करू?



**उत्तर** : वयात अंतर असूनही आनंदाने संसार करणारी बरीच जोडपी पहायला मिळतात. अशा नात्यांमध्ये दोघांनीही एकमेकांना समजून घ्यायला हवं. दुसरं म्हणजे तुला या मुलाबद्दल फक्त आकर्षण वाटतं का हे खरंच प्रेम आहे, हे आधी ठरवून घे. या मुलाचंही तुझ्यावर प्रेम असल्याचं तू गृहित धरलं आहेस. त्याला तुझ्याबद्दल नेमकं काय वाटतं हे आधी जाणून घे. याबाबत त्याच्याशी बोल. त्यालाही तुझ्याबद्दल प्रेम वाटत असेल तर पुढे जाता येईल. तू आयुष्यात यशस्वी आहेस. पण या मुलाचं शिक्षण सुरू आहे. त्यामुळे त्यालाही करिअर घडवायचं असेल. म्हणूनच त्याच्या मनातलं जाणून घे. गरज पडल्यास समुपदेशकांची मदत घे.

## फॅशन पॅशन

### पुरुषांच्या पादत्राणांची शैली



मुलींकडे चप्पल, हील्स, फ्लॅट्स, शूज, बूट, लोफर्स, सँडल, कोल्हापुरी चप्पल अशी विविध प्रकारची पादत्राणे असतात. मुलांकडे चप्पलपासून ते लोफर्स, शूज आणि बूटपर्यंत विविध पर्याय आहेत. तथापि, बाजारात अनेक प्रकारचे लोफर्स, शूज आणि बूट उपलब्ध आहेत. प्रत्येक प्रकार त्याच्या अद्वितीय शैलीसाठी ओळखला जातो.

*** टी-शर्ट आणि जीन्स-** टी-शर्ट आणि जीन्सबरोबर स्नीकर्स, ब्लाउसन मोजे, टॅन बूट, ब्लॅक लेस-अप आणि गुडघ्यापर्यंतचे बूट वापरू शकता.

*** शॉर्ट्स-** शॉर्ट्सबरोबर बूट शूज, स्नीकर्स आणि एस्पॅड्रिल टी-शर्ट आणि जोडू शकता.

*** चिनोज-** चिनोज छान दिसतात. मुले त्यावर टी-शर्ट आणि शर्टसदेखील घालू शकतात. चिनोजबरोबर स्नीकर्स, कॅम्प मॅक्स आणि पेनी लोफर्स वापरू शकता.

*** ड्रेस पॅन्ट-** आजकाल बहुतेक मुले ड्रेस पॅन्ट पसंत करतात. ते घालायला जितके आरामदायी आहेत तितकेच ते दिसायलाही सुंदर आहेत. तुम्ही त्याबरोबर मंक स्ट्रॅप्स, विंगटिप्स, ब्रोग्स, कॅपटोज आणि प्लेन टो ब्लूचर घालू शकता.

*** एथनिक वेअर-** सूट आणि कुर्ता पायजामा सारख्या एथनिक वेअरबरोबर संपूर्ण कट शूज, कॅप टोज आणि चेल्सी बूट घालू शकता. याशिवाय, मुलांसाठी इतरही अनेक पादत्राणे आहेत.

# दक्षिण भारतातील प्रेक्षणीय पर्यटनस्थळे

भटकंती

दक्षिण भारतात एक्सप्लोर करण्यासारखे बरेच काही आहे. कुठे जायचे, तिथे कसे जायचे आणि किती खर्च येईल याबद्दल लोक अनेकदा गोंधळलेले असतात.

*** केरळमधील निसर्गाचा आनंद घ्या**

केरळ हे दक्षिण भारतातील सर्वात सुंदर राज्यांपैकी एक आहे. येथील नैसर्गिक दृश्ये तुम्हाला मंत्रमुग्ध करतील. केरळमध्ये तुम्हाला निसर्गाच्या सानिध्यात हरवून गेल्यासारखं वाटेल. कारण हे राज्य हिरव्यागार झाडांनी वेढलेले आहे. अलेप्पीचे बॅकवॉटर, आयुर्वेदिक मसाले आणि हाऊसबोट्स हे पाहून फिरण्याचा आनंद द्विगुणित करेलच. मुन्नार, अलेप्पी, कोची आणि थेक्कडी अशी अनेक ठिकाणे आहेत. केरळमधील कोणत्याही शहरात जाण्यासाठी तुम्ही विमान आणि ट्रेनने जाऊ शकता. केरळ





फिरण्याचा खर्च तुमच्या राहण्याचा खर्च, जेवण आणि पर्यटनावर अवलंबून दहा ते वीस हजार रुपयांपर्यंत होऊ शकतो.

*** तामिळनाडूची प्राचीन मंदिरे**

तामिळनाडू प्राचीन मंदिरांसाठी ओळखले जाते. शिवाय हे राज्य संस्कृती, शास्त्रीय नृत्य, भरतनाट्यमसाठी प्रसिद्ध आहे. मदुराई (मीनाक्षी मंदिर), तंजावर, रामेश्वरम आणि कन्याकुमारी ही ठिकाणे भेट देण्यासाठी सर्वोत्तम ठिकाणांपैकी एक आहेत. तुम्ही धार्मिक स्थळांना भेट देण्यासाठी दक्षिण भारतात येत असाल, तर तामिळनाडूपेक्षा चांगले काहीही नाही. येथील मंदिरे इतकी सुंदर आहेत, की तुम्ही त्यांच्या सौंदर्याने मोहित व्हाल. समुद्रकिनाऱ्यांना भेट दिल्याने सूर्यास्ताचे एक चित्तथरारक दृश्य दिसते. तुम्ही येथे ट्रेन, विमान किंवा स्वत:च्या गाडीने येऊ शकता. बजेटनुसार, ते केरळपेक्षा थोडे स्वस्त आहे. तुम्ही ८,००० ते १५,००० रुपयांत येथील ठिकाणांना भेट देऊ शकता.

*** कर्नाटक एक चांगला पर्याय**

कर्नाटक पर्यटकांमध्येही खूप लोकप्रिय आहे. येथे तुम्हाला इतिहास आणि निसर्गाचा संगम दिसेल. हंपीच्या अवशेषांपासून ते कॉफीच्या बागांपर्यंत, येथील प्रत्येक गोष्ट खरोखरच मनमोहक आहे. म्हैसूर पॅलेस कर्नाटकात आहे. कर्नाटकमध्ये असंख्य हिल स्टेशन्स आहेत. तिथे ट्रेकिंग, पॅलेस टूर आणि कॉफीची चव घेण्याचा अनुभव मिळतो. कर्नाटकमध्ये दोन आंतरराष्ट्रीय विमानतळ आहेत. त्यामुळे तुम्ही विमानानेदेखील या ठिकाणी पोहोचू शकता. रेल्वे प्रवास थोडा जास्त असू शकतो. तुम्ही टूर पॅकेज घेऊन गेलात, तर तुम्ही सुमारे ३० हजार रुपये खर्च येऊ शकतो.

## फिटनेस फंडा

### कसं धावायचं?



शरीराला बरेच लाभ मिळवून देणारा व्यायाम म्हणजे धावणं. बरेच जण नियमित धावतात तर काहींना धावायला सुरूवात करायची असते. अशा वेळी नेमकं किती धावायला हवं, किती अंतर कापायला हवं असे प्रश्न उपस्थित होतात. प्रत्यक्षात अंतरापेक्षाही धावण्याचा कालावधी महत्त्वाचा ठरतो. सर्वसाधारणपणे ३० मिनिटं धावल्याने बरेच लाभ मिळू शकतात. मात्र धावण्याचा कालावधी व्यक्तीनुसार, वजन कमी करण्याच्या उद्दिष्टांनुसार बदलू शकतो. नव्याने धावायला सुरूवात करणाऱ्यांनी थोडं दमाने घ्यायला हवं. तुम्हाला दुसऱ्या व्यायामाची सवय असली तरी धावणं हा पूर्णपणे वेगळा व्यायाम आहे. त्यामुळे शरीराला धावण्याची सवय व्हायला थोडा वेळ लागतो. म्हणूनच दुखापत टाळण्यासाठी सुरूवातीला हळू धावावं. काही दिवसांनी वेग वाढवत न्यावा. शरीराला धावण्याची सवय लागावी यासाठी तीन मिनिटं धावून मिनिटभर चालावं. असं दहा ते पंधरावेळा करता येईल. 'अमेरिकन हार्ट असोसिएशन'च्या म्हणण्यानुसार दिवसातून दोन किंवा तीन वेळा दहा ते पंधरा मिनिटं धावल्यानेही सलग ३०मिनिटं धावण्याचे लाभ मिळू शकतात. तुमच्या किती कॅलरी खर्च होणार हे धावण्याच्या वेगावर ठरतं. चढावर धावताना शरीराला जास्त ऊर्जा लागते. त्यामुळे अधिक कॅलरी खर्च होतात.

# इंजिनियरिंगनंतर एमबीए करावं का?

उच्चशिक्षण

एममबीए या अभ्यासक्रमाला सध्या प्रचंड मागणी आहे. एमबीए झाल्यानंतर चांगल्या कंपनीत भरपूर पगाराची नोकरी मिळते. म्हणून एमबीए करण्याकडे बऱ्याच तरुणांचा ओढा असतो. एमबीए प्रवेशासाठी 'कॉमन अ‍ॅडमिशन टेस्ट' म्हणजे 'कॅट' परीक्षा द्यावी लागते. या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इंजिनिअरींग केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या बरीच जास्त असते. आता इंजिनिअरींगची पदवी मिळवल्यानंतर एमबीए करावं का, असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. याबाबतचं मार्गदर्शन...




* इंजिनिअरींग केलेल्या विद्यार्थ्यांकडे तांत्रिक ज्ञान असतं. या ज्ञानाला एमबीएची जोड दिल्यावर विद्यार्थ्यांना व्यावसायिक ज्ञान मिळतं. अशा विद्यार्थ्यांसाठी नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध होतात. दोन्ही विषयांचं ज्ञान असणाऱ्या उमेदवारांना मागणीही वाढते. इंजिनिअरींगनंतर विद्यार्थी त्यांच्या शाखेशी संबधित नोकऱ्यांसाठी अर्ज करू शकतात. मात्र एमबीए केल्यानंतर भारतीय कंपन्यांसह बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये संधी मिळू शकते. शिवाय स्वत:चा उद्योगही सुरू करता येतो.

* इंजिनिअरींगचं विश्व तुलनेने बरंच लहान आहे. मात्र एमबीए केल्यानंतर असंख्य कंपन्यांची कवाडं तुमच्यासाठी खुली होऊ शकतात. एमबीए केल्यामुळे तुम्ही व्यवसायाशी संबंधित सर्व माहिती मिळवू शकता. सध्या स्टार्ट अप्सची चलती आहे. इंजिनिअरींगसह एमबीएचं ज्ञान असेल तर तुम्ही स्वत:चा उद्योग सुरू करू शकता. विविध संकल्पनांवर आधारित स्टार्ट अप्स चांगली कामगिरी करताना दिसतात. त्यामुळे इंजिनिअरींग केल्यानंतर एमबीए करणं अनेक अर्थांनी योग्य ठरतं.

# ड्रोन तंत्रज्ञानाने वाढता रोजगार

वेगळ्या वाटा

सुरुवातीला लष्करी वापरासाठी वापरली जाणारी ड्रोन किंवा मानवरहित हवाई वाहने नागरी वापरासाठी मोठ्या प्रमाणात वापरली जाऊ लागली, तेव्हा ड्रोन लोकप्रिय झाले. सध्या ड्रोन तंत्रज्ञानाने लक्ष वेधून घेतले आहे.

सातत्याने ड्रोन तंत्रज्ञानात वेगाने प्रगती होत आहे. ड्रोन किंवा मानवरहित हवाई वाहने अनेक कॉन्फिग्युरेशनमध्ये येऊ शकतात. सर्व त्यांच्या डिझाइन, उड्डाण वैशिष्ट्यांवर आणि कार्यक्षमतेवर आधारित विशिष्ट कार्यांसाठी डिझाइन केलेले असतात. आवश्यक त्या उंचीवर उड्डाण करण्याचे फायदे, वेग, लवचिकता आणि निरीक्षण उपकरणे आणि सेन्सरसारखी उपकरणे वाहून नेण्याची त्यांची क्षमता यामुळे, शेती, वनीकरण, पायाभूत सुविधा, भू-तंत्रज्ञान अभियांत्रिकी इत्यादी अनेक क्षेत्रांमध्ये ड्रोनचा वापर अधिक प्रमाणात केला जात आहे.

*** सध्याचे ड्रोन तंत्रज्ञान**

अलिकडच्या वर्षांत ड्रोन-आधारित प्रणालींवरील शैक्षणिक संशोधन वाढत आहे. ज्यामध्ये सिस्टम डिझाइन, हार्डवेअर, प्रोपल्शन सिस्टीम, ऊर्जा तंत्रज्ञान, नियंत्रण प्रणाली आणि लँडिंग सिस्टीम यांसारख्या तांत्रिक हार्डवेअरवरील ड्रोनच्या विविध पैलूंवर लक्ष केंद्रित केले जात आहे. ड्रोन सॉफ्टवेअर ड्रोन ऑपरेशन्सना पुढे नेण्यात आणि सुव्यवस्थित करण्यात, उड्डाण नियंत्रण, पर्यावरण संवाद, डेटा प्रक्रिया आणि विश्लेषण, नेटवर्किंग आणि संप्रेषण, सुरक्षा आणि गोपनीयता यांचा समावेश करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. आजकाल ड्रोन ऑपरेशन्सना सक्षम करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणक विज्ञान, ऑब्जेक्ट टाळण्याचे तंत्रज्ञान, बिग डेटा आणि ब्लॉकचेन यासारख्या अनेक प्रगत तंत्रज्ञानाचा संयुक्तपणे विकास करण्यात आला आहे.



*** ड्रोन सॉफ्टवेअर अभियांत्रिकी आव्हाने**

ड्रोन सॉफ्टवेअर अभियांत्रिकी क्षेत्रात, संशोधकांना अनेक महत्त्वपूर्ण आव्हानांचा सामना करावा लागतो. प्रथम रिअल-टाइम नियंत्रण प्रणाली आणि जलद प्रतिसाद देण्याची क्षमता महत्त्वाची आहे, कारण कोणताही विलंब नियंत्रण गमावण्याचा आणि अपघातांचा धोका निर्माण करू शकतो. याव्यतिरिक्त रिअल-टाइममध्ये 'ग्लोबल पोझिशनिंग सिस्टम' (जीपीएस), इनरशल मेजरमेन्ट युनिट (आयएमयू) आणि कॅमेरे यासारख्या वेगवेगळ्या सेन्सर्समधून डेटा एकत्र करणे आणि प्रक्रिया करणे खूप क्लिष्ट आहे. ड्रोनसाठी स्वायत्तता, निर्णय घेण्याची आणि सुरक्षित नेव्हिगेशन क्षमता विकसित करणे हे महत्त्वाचे आव्हान आहे. त्यासाठी अनिश्चितता आणि बदलणारे वातावरण हाताळण्यासाठी अल्गोरिदम आवश्यक आहेत. या वापराच्या धोकादायक स्वरूपामुळे ड्रोन सॉफ्टवेअरसाठी विश्वासार्हता आणि अनावश्यक गोष्टी सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे. बॅटरी व्यवस्थापन आणि पॉवर ऑप्टिमायझेशन देखील महत्त्वाचा मुद्दा आहे.

# फॅशन लग्नसराईतली...

फॅशन पॅशन



लग्नसमारंभासाठीच्या या स्टायलिंग टिप्स...

* थोडं हटके आणि स्टायलिश दिसायचं असेल तर कुर्त्यावर लेअरिंग करता येईल. छान नक्षीकाम केलेला क्रीम कुर्ता घ्या. त्यावर लांब बंदगळा कॅरी करा. चुडीदार कुर्ता आणि बंदगळा यात तुम्ही भाव खाऊन जाल.

* साधेपणातही स्टाईल जपता येते. थोडं नक्षीकाम असणारा बेज रंगाचा कुर्ता आणि जोधपुरी पॅंट कॅरी करा. त्यावर कोल्हापुरी चप्पल घाला. यात तुम्ही नक्कीच उठून दिसाल. हा पेहराव कोणत्याही ऑकेजनची शान ठरेल.

* प्रिंटेड कुर्ता कोणत्याही कार्यक्रमात शोभून दिसतो. त्यामुळे छानसा प्रिंटेड कुर्ता विकत घ्या. साखरपुडा असो किंवा रिसेप्शन, या प्रसंगी तुम्ही प्रिंटेड कुर्ता घालू शकता. प्रिंटेड कुर्त्यावर बेज रंगाची पॅंट घालता येईल.

* लग्न सोहळ्यात शेरवानीला बरीच मागणी असते. बरीच मुलं शेरवानी घालून मिरवतात.

### स्थानिकच्या निवडणुकांमध्ये
# महायुतीच बाजी मारणार
### मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दावा



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी भाजपने मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची राज्य निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे.

बावनकुळे यांनी महायुती आघाडीवर पूर्ण विश्वास व्यक्त करत ५१ टक्के मत मिळवून राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये दोन-तृतीयांश बहुमत मिळवण्याचे उद्दिष्ट स्पष्ट केले. प्रत्येक जिल्ह्यात प्रचार व समन्वय समित्या नेमून महायुती आघाडीची तयारी मजबूत केली जात आहे.

कामठी नगरपरिषदेसह राज्यातील सर्व नगरपालिकांमध्ये महायुती एकसंधपणे आणि ताकदीने मैदानात उतरली असून, ह्लजनता विकासाला मत देणार आहे, धर्मपंथापलीकडे जाऊन मतदान होईल, असा ठाम विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला असला तरी त्यांच्यासमोर बंडखोरांचे मोठे आवाहन आहे.

कामठी येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना बावनकुळे म्हणाले, कामठीमध्ये नगराध्यक्ष अजय अग्रवाल यांच्यासह सर्व नगरसेवकांनी महायुतीतर्फे अर्ज भरले असून, महायुतीला किमान ५१ टक्के मते मिळणार असल्याने आमचा विजय निश्चित आहे. विदर्भातील अनेक ठिकाणी महायुतीची युती झाली आहे. काही ठिकाणी महायुती म्हणून तर काही ठिकाणी मित्रपक्ष म्हणून आम्ही लढत आहोत. ज्या ठिकाणी मित्रपक्षाविरुद्ध लढत आहोत, तिथे मनभेद निर्माण होऊ देणार नाही, असे ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे डबल इंजिन सरकार सर्वसमावेशक विकास करत आहे. योजनांचा लाभ सर्व समाजापर्यंत पोहोचवायचा असेल, तर महायुतीचा नगराध्यक्ष निवडून येणे गरजेचे आहे. नगरपालिकांचा विकास करण्याची क्षमता भाजप आणि महायुतीकडेच आहे, असे त्यांनी सांगितले.

काही ठिकाणी झालेल्या बंडखोरीवर बोलताना ते म्हणाले, अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत सर्व बंडखोर आपले अर्ज मागे घेतील. गोंदिया-भंडारा येथे राष्ट्रवादी काँग्रेस स्वबळावर लढत असल्याचेही त्यांनी सांगितले. बिहारचा प्रभाव महाराष्ट्रातही दिसेल, या निवडणुकीत महायुती राज्यभरात विजयी होईल, असा दावा त्यांनी केला.

# थंडीत तापणार उपराजधानी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :** राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासून नागपुरात होणार आहे. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सोमवारी एका अधिसूचनेद्वारे ही घोषणा केली.

या अधिवेशनात राज्यातील कळीचे कायदे, जनहिताचे प्रश्न व विभागीय विकास आदी मुद्यांवर सखोल चर्चा होण्याची शक्यता आहे. याशिवाय अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यात झालेल्या दिरंगाईवरही या अधिवेशनात गरमागरम चर्चा होण्याची शक्यता आहे.

राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा फड रंगला आहे. राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींसाठी येत्या २ डिसेंबर रोजी निवडणूक होणार आहे. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे. त्यानंतर जिल्हा परिषदा व महापालिकांचीही निवडणूक होणार आहे. त्याची घोषणा डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. या घटनाक्रमामुळे राज्य विधिमंडळाचे नागपुरात होणारे हिवाळी अधिवेशन लांबणीवर पडेल असा अंदाज व्यक्त केला जात होता. पण राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सोमवारी एका अधिसूचनेद्वारे हे अधिवेशन ८ डिसेंबरपासूनच सुरू होणार असल्याचे स्पष्ट केले.





**जोरदार खडाजंगी**

या अधिसूचनेत विधानसभा व विधानपरिषदेचे कामकाज ८ डिसेंबर रोजी अनुक्रमे सकाळी ११ वा. व दुपारी १२ वा. सुरू होणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यात हे अधिवेशन किती दिवसांचे असेल म्हणजे ते केव्हा संपुष्टात येईल याचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे हे अधिवेशन सरकार एक किंवा दोन आठवड्यांत आटोपते घेईल असे मानले जात आहे. या अधिवेशनात महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न, वीज दरवाढ, बेरोजगारी, कथित मतचोरी, कळीचे कायदे आदी मुद्यांवरून सरकार व विरोधकांत जोरदार खडाजंगी होण्याची शक्यता आहे.

**अधिवेशनाची तयारी पूर्ण**

दुसरीकडे, राज्य सरकारने या अधिवेशनासाठी तयारीला सुरुवात केली आहे. अधिवेशनाच्या सुरक्षेच्या तसेच लॉजिस्टिक दृष्टीने तयारी करण्यात येत आहे. विधिमंडळ सचिवालयाने अधिवेशनासाठी सर्व सदस्यांना सूचना पाठवल्या आहेत. या अधिवेशनासाठी सर्व मंत्र्यांचे निवास व कार्यालये काही काळासाठी नागपुरात हलवण्यात येते. त्यामुळे पुढील काही दिवसांत नागपूरमध्ये राजकारण्यांची ये-जा वाढणार आहे.

राज्य शासनाकडून अधिवेशनासाठी सुरक्षेच्या तसेच लॉजिस्टिक दृष्टीने तयारी करण्यात येत आहे. विधिमंडळ सचिवालयाने अधिवेशनासाठी सर्व सदस्यांना सूचना पाठवल्या असून, नागपूरमध्ये रेल्वे व हवाई सेवांमध्येही अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर वाढ होण्याची शक्यता आहे. या प्रकरणी विधिमंडळ परिसरा व नागपूर शहरात मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात केला जाणार आहे.

### ८ डिसेंबरपासून विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन

नागपूर करारानुसार, हिवाळी अधिवेशन नागपुरात घेतले जाते. १९६० मध्ये पहिल्यांदा नागपुरात हिवाळी अधिवेशन झाले होते. ते १० नोव्हेंबर ते १६ डिसेंबर असे २७ दिवसांचे अधिवेशन होते. तेव्हापासून कधी ३ आठवडे, तर कधी २ आठवड्यांचे हिवाळी अधिवेशन होत आहे. १९६८ साली सर्वाधिक २८ दिवसांचे अधिवेशन नागपुरात झाले होते. पण त्यानंतर या अधिवेशनाचा कालावधी सातत्याने कमी होत आहे. अधिसुचनेत कालावधी नमूद नसल्याने यावर्षी देखील हे अधिवेशन एक किंवा दोन आठवड्यांचे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## बुलढाण्यात काँग्रेस, वंचितची अनपेक्षित चाल

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १७ :** बुलढाणा जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रणधुमाळीपूर्वी राजकीय वातावरण तापलं आहे. विधानसभा,लोकसभा पातळीवर अनेकदा अपयशी ठरलेली काँग्रेस, वंचित युतीची चर्चा अचानक नवे वळण घेत आहे. दोन दिवसांपूर्वीच शीर्षस्थ नेत्यांनी स्थानिक गणित पाहून निर्णय अशी सावध भूमिका घेतली होती. मात्र, जिल्हा पातळीवर दोन्ही पक्षांच्या अंतर्गत बैठका, गुप्त वाटाघाटी, आणि जागावाटपावरून सुरू असलेली रस्सीखेच निर्णायक टप्प्यात पोहोचली.

राजकीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बुलढाणा जिल्ह्यातील बुलढाणा, सिंदखेडराजा, देऊळगावराजा, लोणार, खामगाव, शेगाव आणि जळगाव-जामोद येथे ताकद आजमावण्यासाठी दोन्ही पक्षांनी एकत्र येण्याचा पक्का निर्धार दर्शवला आहे. नगराध्यक्षपदाच्या निवडणुका एकत्र लढवण्याचा प्रारंभिक प्रस्ताव ठेवताच चर्चेला वेग आला. ५०-५० टक्के जागावाटपाचा फॉर्म्युला अंतिम टप्प्यात पोहोचल्याची माहिती राजकीय वतुळात चांगलीच खळबळ माजवत आहे. प्रचारयंत्रणा, उमेदवारांची निवड, कार्यकर्त्यांचे नेटवर्क आणि स्थानिक तक्रारी यावर दोन्हीकडून बारकाईने काम चालू आहे. या प्रयत्नांनी जिल्ह्यात नव्या समीकरणांची चाहूल लागली आहे.

## परवडणाऱ्या घरांसाठी रस्त्यावर उतरणार घर हक्क परिषद

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :** घर हक्क परिषदेच्या माध्यमातून विविध ३१ संघटना एकत्र आल्या असून परवडणारी घरे मिळाली पाहिजेत यासाठी या संघटना लढा देत आहेत. भूमिपुत्रांना त्यांच्या हक्काची घरे मुंबईतच मिळाली पाहिजे, मुंबई बाहेर शेलू वांगणी सारख्या दूर जागी जाणार नाही असा स्पष्ट इशारा घर हक्क परिषदेच्या वतीने देण्यात आला.

बंद पडलेल्या गिरण्या व कारखान्यांच्या फक्त ३३ टक्के जागेवर नाही तर संपूर्ण जागेवर ही घरे द्यावीत. हक्कांच्या घरासाठी सर्व संघटना एकत्र येऊन तीव्र लढा येणार असून नागपुरच्या अधिवेशनावर भव्य मोर्चा काढून सरकारलाही जागे करु, असे घर हक्क परिषदेच्या वतीने विश्वास उटगी यांनी म्हटले आहे.

गांधी भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अर्थशास्त्र विभागाचे अध्यक्ष विश्वास उटगी म्हणाले की, सरकार आम्हाला जमीन देत नाही मात्र काही उद्योगपतींना या जमिनी देत आहे.

भाड्याच्या घरात राहणारे, पागडीवर राहणारे, झोपडपट्टीत राहणारे तसेच जुन्या इमारातींच्या पुनर्वसनाचा मोठा प्रश्न आहे पण सरकार या लोकांचे हक्काच्या घराचे अधिकार दडपून टाकत आहे. या जागा बिल्डरांना देऊन मुळ भूमीपूत्रांना मुंबईच्या बाहेर घालवले जात आहे.



### नागपुरच्या हिवाळी अधिवेशनात काढणार भव्य मोर्चा

१ लाख १० हजार गिरणी कामगारांना घरे देण्यासाठी नोंदणी झालेली आहे पण मागील २५ वर्षात अवघी १५ हजार घरे देण्यात आली. आहेत. लाखो कामगारांना त्वरित घरे का मिळाली नाहीत? मुंबई बाहेरील धुळे, सोलापूर, इचलकरंजी, नागपूर अशा अनेक ठिकाणी बंद पडलेल्या मिल कामगारांना न्याय कधी मिळणार? असा सवाल त्यांनी केला.

राज्य सरकारने १ ऑगस्ट २०१९ ला जीआर काढून शेलू, वांगणीला घरे देऊ असे म्हटले आहे. हा जीआर रद्द करण्याची मागणी असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सरकारमधील मंत्र्यांना तसे निवेदन दिलेले आहे, जीआर बदलण्याचे आश्वासन दिले आहे पण अजून अंमलबजावणी मात्र झालेली नाही.

राज्य सरकारचे गृहनिर्माण धोरण हे परवडणारी हक्काची घरे नाकारणे आहे. या भूमिपुत्रांनी कुठे जायचे, या प्रश्नावर न्यायलयात लढा सुरु असून भूमिपुत्रांच्या बाजूने निकाल असतानाही त्याची अंमलबजावणी केली जात नाही म्हणून सरकारच्या विरोधात आंदोलन करणार आहेत.

२३ नोव्हेंबरला पहिली सभा शैलेंद्र विद्यालय दहिसर पूर्व येथे होईल तर दुसरी सभा कांजूर मार्ग/ भांडूप येथील वस्त्या मध्ये होईल, त्यानंतर ठाणे, पनवेलसह इतर भागातील वस्त्यांमध्ये या सभा घेतल्या जाणार आहेत.

हक्कांच्या घरासाठी सर्व राजकीय पक्षांची मदत घेऊ तसेच मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांना निवेदनही देणार आहोत असे विश्वास उटगी यांनी सांगितले. यावेळी धर्मराज्य पक्षाचे राजन राजे, शिशिर ढवळे, दत्तात्रय अट्याळकर, आसिष मिश्रा आदी उपस्थित होते.

## आयुर्वेदिक आहार पद्धती



**लोकारोग्य**

एखादी व्याधी झाल्यानंतर त्या व्याधीवर उपचार कोणते आहेत? याचा शोध घेण्यापेक्षा ती व्याधी होऊच नये म्हणून दक्ष राहणे आणि त्यासाठीच आयुवेर्दाने सांगितलेल्या नियमांचे योग्य आहाराचे पालन केले तर आपले जीवन हे निरामय निश्चित होऊ शकते, किंबहुना आयुर्वेदिय आहार पद्धती ही निरामय आयुष्याची गुरुकिल्ली आहे असच म्हणता येईल.आयुर्वेदाने आजवर चांगले आचार, विचार, दिनचर्या, ऋतू चर्या याबाबत आपल्याला अगदी प्राचीन काळापासून मार्गदर्शन केलेले आहे. आयुर्वेदिय आहार पद्धती म्हणजे नेमकी कोणती आहार पद्धती? या आहार पद्धतीचे नियम नेमके काय आहेत? आणि अशा प्रकारच्या आहार पद्धतीमुळे आपले जीवन निरामय कशा प्रकारे होऊ शकते? याच प्रश्नाचा वेध घेण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे कार्यरत असलेल्या डॉ. माधुरी वाघ यांच्याशी साधलेला संवाद.

**आपला आहार नेमका कसा असावा?**

■ आहाराबद्दल बोलण्या अगोदर आपण आयुर्वेद म्हणजे काय हे अगोदर समजून घेऊया.आपल्या जन्मापासून मृत्यपर्यंत चा जो आपला प्रवास असतो ते आपल आयुष्य असतं आपल प्रत्येकाचं आयुष हे सुखी , समाधानी, आनंदी असावं अस प्रत्येकालाच वाटत. आपली दिनचर्या कशी असावी, आपला आहार सात्विक का असावा ? हे सांगणार गमक म्हणजेच आयुर्वेद.

थोडक्यात आपल्या आरोग्याचं रक्षण करणार शास्त्र म्हणजे आयुर्वेद. मात्र आपण आपल्या जिभेचे चोचले पुरवत असतो आणि अगदी अधाशासारखे खात असतो.अन्न हे पूर्ण ब्रह्म आहे अस आपण म्हणतो म्हणूनच जगण्यासाठी खावं खाण्यासाठी जगू नये. इंद्रधनुष्याचा सप्त रंगात प्रमाणे जर आपल्या ताटातील आहार असेल सप्तरंगी तर आपण दीर्घायुषी होऊ शकतो.

**आपल्या परिपूर्ण आहारात षडरसांचे महत्त्व नेमके काय सांगता येईल?**

■ आहारातील षड रस म्हणजे तिखट, आंबट, तुरट, गोड, कडू आणि खारट असे सहा रस आहेत. आपण जेवताना नेहमी गोड अगोदर खातो परंतु आयुर्वेद नुसार प्रथम मधुर खावे म्हणजे वरण भात तूप. नंतर आम्ल रस असलेले पदार्थ दही, कढी, दहीवडे वैगेरे आणि शेवटी तुरट म्हणजे पोळी, भाजी वैगेरे. शेवटी ताक किंवा दही घ्यावं.

आपल्या शरीरात वात कफ आणि पित्ताची उत्त्पती व्यवस्थित होऊन खाल्लेले अन्न व्यवस्थित पचन व्हावे याकरिता आपल्या आहारातील पदार्थांचा क्रम हा असा असावा. अर्थात गोड पदार्थ सर्वात शेवटी थोडा खाल्ला तरी चालू शकते.

**भोजन हे केंव्हा, कुठे आणि कस करावं याचे काही नियम आयुर्वेदाने सांगितले आहेत का?**

■ काही लोक दिवसातून दोन वेळा जेवतात तर काही लोक तीन वेळा जेवतात मात्र आयुवेर्दाने जेवणाच्या बाबतीत उभय काल अस सांगितलेलं आहे.म्हणजेच दिवसातून दोन वेळा जेवण कधीही इष्ट. आपले ऑफिस, इतर कामाच्या गडबडीत अनेकदा आपण जेवणाच्या वेळा टाळतो.

परंतु आपल्याला जेंव्हा भूक लागते तेंव्हा काहीतरी खायला हवे आणि भूक नसेल तर मुद्दाम खाऊ नये. सकाळीं १२ च्या आत आणि रात्री ७ किंवा ८ वाजता जेवण चांगल असतं.

आपल्या पोटात जे पाचक रस निर्माण होतात जे अन्न पचन करतात हे रस मंदावले की खायला हवे अन्यथा अपचनाचा त्रास होतो. आपले जेवण पूर्ण पचले की आपोआपच पाचक रस मंदावतात आणि अग्नी प्रज्वलित होतो तेंव्हा खायला हवं.

**वयोमानानुसार आपला आहार कसा असावा?**

■ किलोमध्ये किंवा कॅलरीज मध्ये आहाराची पद्धती आयुवेर्दामध्ये नसते. आयुर्वेदानुसार आपले पोट हे अर्धे जेवणाने भरलेले असावे पाव भाग पाण्याने भरलेला आणि पाव भाग रिकामा असावे.

आपले अन्न पचन व्यवस्थित होण्यासाठी नेहमी अर्धे जेवावे. छोटी मूल भरपूर खेळतात त्यांना वारंवार भूक लागते तर त्यांनी खायला हवं. मात्र चाळीशी नंतर आपल्या शरीराची संपूर्ण वाढ झालेली असते तेंव्हा आवश्यक तेवढंच जेवावं. भोजनापूर्वी काकडी किंवा सलाड खाऊ नये त्याने अपचनाचा त्रास होतो. आपलं जेवण हे अगदी सात्विक पद्धतीचं म्हणजे भात, भाजी, पोळी, आमटी असं असावं. ■ ■ ■

## बंधन म्युच्युअल फंडचा बंधन हेल्थकेअर फंड लॉंच





बंधन म्युच्युअल फंडने बंधन हेल्थकेअर फंड लॉंच करण्याची घोषणा केली, ही एक ओपन-एंडेड इक्विटी योजना आहे जी आरोग्यसेवा, औषध आणि संबंधित सेवांमध्ये गुंतवणूक करते.

हा फंड भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांपैकी एक, आरोग्यसेवा, रुग्णालये आणि निदान, औषधनिर्माण, जैवतंत्रज्ञान, कल्याण, आरोग्य-तंत्रज्ञान आणि इतर क्षेत्रातील संधी मिळवण्याचा प्रयत्न करतो.

नवीन फंड ऑफर सोमवार, १० नोव्हेंबर २०२५ रोजी सुरू झाला असून सोमवार, २४ नोव्हेंबर २०२५ रोजी बंद होईल. बंधन हेल्थकेअर फंडमध्ये गुंतवणूक परवानाधारक म्युच्युअल फंड वितरक, गुंतवणूक सल्लागार, ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे किंवा थेट करता येते.

बंधन एएमसीचे सीईओ विशाल कपूर यांनी नवीन ऑफरबद्दल चर्चा करताना सांगितले की, आरोग्यसेवा ही केवळ एक गरज नाही; ती आपल्या काळातील सर्वात टिकाऊ वाढीच्या विषयांपैकी एक आहे. लोकसंख्या वाढत असताना आणि वैद्यकीय नवोपक्रमांना गती येत असताना, जागतिक स्तरावर आणि भारतात आरोग्यसेवा परिसंस्था वेगाने विस्तारत आहेत.

आर्थिक प्रगतीसह, आरोग्यसेवा खर्च स्वाभाविकपणे वाढतो आणि भारतही त्याला अपवाद नाही. मजबूत वाढ असूनही, दरडोई खर्च आणि पायाभूत सुविधा तुलनेने कमी राहतात, तर विमा कव्हर आणि उत्पन्नात सुधारणा होत राहते, ज्यामुळे शाश्वत विस्तारासाठी दीर्घ धावपळ सुरू होते.

बंधन हेल्थकेअर फंड गुंतवणूकदारांना या संरचनात्मक परिवर्तनात सहभागी होण्यासाठी एक शिस्तबद्ध आणि वैविध्यपूर्ण मार्ग प्रदान करतो, दीर्घकालीन दृष्टिकोनातून आरोग्यसेवा मूल्य साखळीत संधी मिळवतो. ■ ■ ■

## गुणकारी पेरू



पेरू हे उष्णकटिबंधीय फळ आहेत जे त्यांच्या स्वादिष्ट चव आणि असंख्य आरोग्य फायद्यांसाठी जगभरात लोकप्रिय झाले आहेत. आपल्या जीवनशैलीत पेरूचा समावेश करण्याचे अनेक फायदे जाणून घेऊया.

पेरूमधील शक्तिशाली अँटिऑक्सिडंट्स आणि फायबर रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करू शकतात.

अभ्यासात असे दिसून आले आहे की पेरूच्या पानांचे अर्क इंसुलिन प्रतिरोधक क्षमता आणि दीर्घकालीन रक्तातील साखरेचे नियंत्रण सुधारू शकतात. पेरूच्या पानांचा चहा प्यायल्याने मधुमेहींमध्ये जेवणानंतर रक्तातील साखर १०% पेक्षा जास्त कमी होते. यामुळे डायबिटीजचे व्यवस्थापन करण्यासाठी पेरू उत्तम पर्याय ठरतोपेरू अनेक प्रकारे ह्रदयाचे आरोग्य वाढवतात. उच्च अँटिऑक्सिडेंट सामग्री ह्रदयाला मुक्त रॅडिकल्सच्या नुकसानापासून संरक्षण करते. एलडीएल कोलेस्टेरॉल आणि रक्तदाब कमी करताना पेरू पोटॅशियम आणि फायबर देखील प्रदान करतात.

ज्या स्त्रियांना वेदनादायक मासिक पाळी येते त्यांना पेरूच्या पानांचा अर्क मदत करू शकतो. अभ्यासातून असे दिसून आले आहे की पेरूच्या पानांचा अर्क दररोज घेतल्याने मासिक पाळीच्या वेदनांची तीव्रता लक्षणीयरीत्या कमी होते. पेरूच्या पानांचे दाहक-विरोधी प्रभाव पीरियड क्रॅम्प्स कमी करण्याचा नैसर्गिक मार्ग देतात. प्रति फळ तुमच्या शिफारस केलेल्या १२% फायबरसह, पेरू निरोगी पचन आणि आतड्यांसंबंधी हालचालींना प्रोत्साहन देतात. फायबर बद्धकोष्ठता दूर करण्यास मदत करते. याव्यतिरिक्त, पेरूच्या पानांच्या अर्कामध्ये प्रतिजैविक प्रभाव असतो जे अतिसारास कारणीभूत असणा-या खराब आतड्यांतील जीवाणू नष्ट करतात. यामुळे आतड्यांचे आरोग्य आणि पचन सुधारते. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

### निवडणुकीसाठी राजापुरात
## मध्यप्रदेशच्या ईव्हीएम

**काँग्रेसचा आक्षेप**

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १७ :** रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी आणण्यात आलेल्या मतदान यंत्र अर्थात ईव्हीएमवर मध्यप्रदेश निवडणूक असा नामोल्लेख आढळला आहे. काँग्रेसचे शहराध्यक्ष अजीम जैतापकर यांनी या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे.

जैतापकर यांनी याविषयी जिल्हाधिकारी मनुज जिंदाल यांच्याकडे तक्रार दाखल केली. 'शुक्रवारी ईव्हीएम सील करताना नगरपरिषदेकडून त्यांना उपस्थित राहण्याची सूचना देण्यात आली होती. त्यावेळी मशीनच्या पेट्या उघडून पाहण्यात आला. त्यात सर्व ईव्हीएमवर मध्य प्रदेश निवडणूक अशी नोंद दिसून आली.

महाराष्ट्रातील राजापूर नगरपालिकेची निवडणूक असताना इथे इतर राज्यातून आलेल्या मशीनवर निवडणूक घेणे संशयास्पद आहे. त्यामुळे या मशीनचा वापर का केला जात आहे? याचा प्रशासनाने खुलासा करावा किंवा महाराष्ट्रातील ईव्हीएम मशीन बदलून देण्यात यावी,' अशी अजीम जैतापकर यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे केली आहे.

दुसरीकडे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी या प्रकरणी आपली बाजू स्पष्ट केली आहे. प्रस्तुत ईव्हीएम मशीन आम्हाला जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राप्त झाल्या आहेत. त्याविषयी काही शंका असल्यास त्यांच्याकडे दाद मागावी. त्यानुसार जैतापकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांनाही पत्र पाठवून या मशीनविषयी तक्रार दाखल केली आहे. आता या तक्रारीननंतर जिल्हाधिकारी काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## काँग्रेस संपवणारा अजून जन्मला नाही

**काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचा पीएम मोदींना टोला**



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १७ :** काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बिहार निवडणुकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस संपल्यासंबंधी केलेल्या विधानाचा खरपूस समाचार घेतला आहे.

काँग्रेस हा भारताच्या डीएनएतून तयार झालेला व कसलेला विचार आहे. हा विचार चंद्र - सूर्य असेपर्यंत कायम राहील. त्यामळुळे काँग्रेसला संपवणारा अजून कुणीही जन्माला आला नाही, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे व सत्ताधारी राष्ट्रवादीचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या वादात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नार्को टेस्टचीही मागणी केली.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, धनंजय मुंडे व मनोज जरांगे पाटील यांच्यातील वादात कुणी मुख्य आरोपी असेल तर ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. मराठा आंदोलक आंतरवाली सराटीत आंदोलन करत होते, तेव्हा त्यांनी पोलिसांच्या माध्यमातून त्यांच्यावर अमानुष अत्याचार केला. यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक विण उद्ध्वस्त झाली. आंतरवाली सराटीच्या निमित्ताने फडणवीसांनी एका जातीला दुस?या जातीच्या विरोधात व एका प्रवर्गालस दुसऱ्या प्रवर्गाविरोधात उभे केले. यामुळे महाराष्ट्राचे वातावरण गढूळ झाले. त्यामुळे या प्रकणी कुणाची नार्को टेस्ट करायची असेल तर ती देवेंद्र फडणवीस यांची झाली पाहिजे.

सपकाळ म्हणाले, भाजपने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निमित्ताने गुंडांना आपल्या पक्षात घेण्याचा सपाटा लावला आहे. मटका किंग, आका-खोका, कोयता गँग अशांचे सत्ताधारी पक्षात रेड कार्पेट घालून स्वागत केले जात आहे. या सर्व गुंडांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत घेऊन जात आहेत. या माध्यमातून मुख्यमंत्री फडणवीस महाराष्ट्रात गुंडाराज स्थापन करण्याचा प्रयत्न करत आहेत.

सपकाळ यांनी फडणवीसांच्या राज्यात आता किल्ल्यांवरही दारू पार्टी होत असल्याचा आरोप केला आहे. ते म्हणाले, महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या वतीने मुंबईतील बांद्रा किल्ल्यावर दारू पार्टी सुरू असल्याची घटना गंभीर आहे. तिथे आज दारूच्या बाटल्या सरकार पर्यटकांना पुरवतंय, हे चिड आणणारं आहे. जनतेने विचार करावा. यांना फक्त पैसा महत्वाचा आहे, अशा शब्दात त्यांनी मुख्यमंत्री आणि सरकारवर तोफ डागली.

# फोन करून उमेदवारी अर्ज भरण्याचे निर्देश

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :** विधानसभेमध्ये भाजपने प्रचंड मोठे यश मिळवले. राज्यात भाजप सर्वात मोठा पक्ष आहे. नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीसाठीही भाजपने सहा महिन्यांपासून तयारी सुरू केली होती. मात्र, अर्ज करण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारपर्यंत भाजपकडून उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली नाही. उमेदेवारांना फोन करून अर्ज भरण्याच्या सूचना दिल्या गेल्या. यामुळे भाजप आणि मित्रपक्षांमध्ये आलबेल नसल्याचे बोलले जाते.

विदर्भामध्ये ४५ नगरपालिका आणि ५५ नगरपंचायतींसाठी निवडूका होत आहेत. तर नागपूर जिल्ह्यातील १५ नगरपालिका आणि १२ नगर पंचायतींच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा आज १७ नोव्हेंबर अखेरचा दिवस होता. महायुती किंवा महाविकास आघाडीतील घटक पक्षात जागा वाटपाबाबत समन्वय नसल्याने पक्षांनी स्वबळावरच जोर दिला. सोमवारी दुपारपर्यंत भाजपकडून यादी जाहीर झालेली नव्हती.



महायुतीतील भाजपचा सूर प्रथमपासूनच स्वबाळकडे आहे, त्यामुळे त्यांनी अद्याप आपली भूमिका स्पष्ट केली नाही. त्यामुळे शिंदेसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने शक्य होईल तेथे युती करून इतरत्र स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. दुसरीकडे काँग्रेसमध्येही हीच स्थिती आहे. महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादीचा शरद पवार गटासोबत काँग्रेसने आघाडीबाबत बोलणीच सुरू केली नाही.

काँग्रेसने तर मुलाखतीही आटोपल्या. त्यामुळे मित्र पक्षांनी काही ठिकाणी स्वबळावर तर काही ठिकाणी इतर पक्षाशी आघाडीसाठी पावले उचलली आहेत.

रामटेक तालुक्यात शिवसेनेचे विद्यमान आमदार व राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांनी काही ठिकाणी भाजपसोबत युती करण्याची भूमिका घेतली आहे. पारशिवनी व कांद्री नगर पंचायतीत हे दोन्ही पक्ष एकत्रित लढण्याची शक्यता आहे, मात्र रामटेक पालिकेबाबत अद्याप सेनेसोबत भाजपची युती होईल किंवा नाही हे स्पष्ट झाले नाही. अन्य ठिकाणी अशीच स्थिती आहे.